




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शुक्रवार, दि. ०६ फेब्रुवारी २०२६



दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर

आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस

जनरेटर विक्री व दुरस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए

Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net



मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०७७ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com





# मुंबई पुणे दृतगती मार्गावर पुन्हा वाहतूक कोंडी

## घाटपरिसरात वाहनांच्या लांबच लांब रांगा

**अलिबाग::** (समर्थ गांवकरी)

मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर पुन्हा एकदा वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. महामार्गावर घाट परिसरात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. त्यामुळे वाहतूक धिम्या गतीने सुरू आहे.

टँकर अपघातामुळे विस्कळीत झालेली मुंबई पुणे द्रुतगती मार्गावरील वाहतूक गुरुवारी सुरळीत झाली. त्यामुळे शुक्रवारी पहाटेपासून मुंबईत अडकून पडलेले प्रवासी मोठ्या संख्येनी पुण्याच्या दिशेने निघाले, त्यामुळे पुणे मार्गीकेवर खालापूर टोल नाक्यापासून बोर घाटातील अमृतांजन ब्रीज पर्यंतच्या परीसरात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. दहा किलोमीटरच्या परिसरात वाहनांची कोंडी झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे महामार्गावरील वाहतूकीचा वेग मंदावला आहे. सलग सुट्ट्यामुळे वाहनांची संख्या वाढल्याचे सांगितले जात आहे. महामार्ग पोलीसांनी पुण्याच्या दिशेने जाणारी वाहनांची गर्दी कमी करण्यासाठी मुंबई मार्गिकेवर ब्लॉक घेतला आहे. पुण्याकडील वाहतूक मुंबई मार्गिकेवर वळवून वाहनांची गर्दी कमी केली जात आहे. त्यामुळे घाटपरीसरातील वाहतुक कोंडी लवकरच कमी होईल असा विश्वास व्यक्त केला जात आहे. महामार्गावर झालेली वाहतुक कोंडी लक्षात घेऊन आता अवजड वाहने रोखण्याचे काम पोलीसांनी सुरू केले आहे. पुण्याच्या दिशेने जाणारी अवजड वाहने बाजूला पार्कींग करण्याचे काम सुरू केले आहे. त्यामुळे घाट परिसरातील कोंडी सुटण्यास मदत होईल असा विश्वास व्यक्त केला जात आहे. मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर पुण्याकडे जाणाऱ्या महामार्गावरील वाहतुक कोलमडली असतांनाच आता जुन्या मुंबई पुणे महामार्गावरही बोरघाटात वाहतूक कोंडी निर्माण झाल्याची बाब समोर आली आहे. बोरघाटात शिंग्रोबा मंदीर परिसरात एका अवघड वळणावर पाईप घेऊन जाणारा ट्रक बंद पडला आहे. तर कार्ला येथील एकविरा देवीला जाणारी पालखीही याच परिसरातून मार्गक्रमण करत आहे. त्यामुळे या मार्गावरील पुण्याकडे जाणाऱ्या वाहतुकीचा वेग मंदावला आहे.



## थोडक्यात...

### चिपळूण मध्ये चार नेत्यांची प्रतिष्ठा पणाला

**चिपळूण (समर्थ गांवकरी) :** चिपळूण पालिका निवडणूकीत दमदार यश मिळवल्यानंतर भाजप शिंदेसेना युतीने जिल्हा परिषद व पंचायत समितीवर एकहाती सत्ता मिळवण्यासाठी कंबर कसली आहे. विरोधी पक्षातील ठाकरे सेनेसह राष्ट्रवादी काँग्रेसचे कडवे आव्हान धुडकावून लावण्यासाठी पुन्हा एकदा प्रयत्न सुरु ठेवले आहेत. या निवडणूकीत आमदार शेखर निकम, भास्कर जाधव, माजी आमदार सदानंद चव्हाण व भाजप नेते प्रशांत यादव यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. तालुक्यात पंचायत समितीच्या 18 आणि जिल्हा परिषदेच्या 9 जागांसाठी ही निवडणूक होत आहे. याकरिता शिवसेना भाजप युतीत भाजपकडून पंचायत समितीला 7 तर जिल्हा परिषदेला 3, शिंदेसेनेकडून पंचायत समितीसाठी 11 आणि जिल्हा परिषदेसाठी 6 उमेदवार रिंगणात आहेत. तर ठाकरे सेनेकडून पंचायत समितीसाठी 15 आणि जिल्हा परिषदेसाठी 7 उमेदवार निवडणूकीला सामोरे जात आहेत.

### 'बाजी' नर वाघाचे साम्राज्य

**चिपळूण (समर्थ गांवकरी) :** गेल्या काही काळापासून सह्याद्रीच्या दुर्गम भागात आपला वावर निर्माण करणाऱ्या बाजी या नर वाघाने आता कोयना परिसरात आपले साम्राज्य प्रस्थापित केल्याचे स्पष्ट झाले आहे. नुकत्याच झालेल्या व्याघ्र गणनेदरम्यान बाजीचे दर्शन कॅमेरा ट्रॅपमध्ये झाले असून, त्याच्या डरकाळीने संपूर्ण सह्याद्रीचा परिसर दुमदुमून गेला आहे. त्यामुळे कोयनेसह चिपळूण तालुक्यातील कोळकेवाडी, तिवडी, तळसर, पोफळी परिसरातील नागरिकांना सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे. सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात सध्या तीन नर वाघांचा संचार आहे. यातील सेनापती आणि सुभेदार यांनी चांदोली परिसरात आपली हद्द निश्चित केली आहे, तर बाजीने कोयना भागातील भैरवगड ते पाली, मालदेव या पट्ट्यात आपला अधिवास निर्माण केला आहे.

# धुळ्यातील 'त्या' घटनेनंतर विधिमंडळाने घेतला धडा

## दौऱ्यावेळी कसं वागायचे आमदारांना शिकवणार

**मुंबई :** (समर्थ गांवकरी)

विधिमंडळाच्या आमदारांचे दौऱ्यावेळी वर्तन कसे असावे यासाठी विधिमंडळ समिती गठीत करण्यात आली आहे. त्यात सुनील प्रभू यांच्यासह ९ सदस्यांचा समावेश करण्यात आला आहे. या समितीच्या प्रमुखपदी भाजपा आमदार चैनसुख संचेती यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदस्यांमध्ये सुनील प्रभू, सुधीर मुनगंटीवार, विजयकुमार देशमुख, दीपक केसरकर, दिलीप वळसे पाटील, अमीन पटेल, अमरिश पटेल आणि रामराजे नाईक निंबाळकर यांचा समावेश असणार आहे. विधान मंडळ समितीच्या दौऱ्यावेळी सदस्यांचे वर्तन, आचरण कसे असावे याबाबत विचारविनिमय करण्यासाठी संयुक्त समिती गठीत करण्यात आली आहे. त्यात उद्धवसेनेचे प्रतोद सुनील प्रभू यांच्यासह ९ सदस्यांचा समावेश आहे. आमदारांचे वर्तन, वागणूक कशी असावी यासाठी ही समिती मार्गदर्शन करणार आहे. राज्यासह इतर राज्यात, परदेशात विधिमंडळ समित्यांचे दौरे होत असतात त्यात राज्यातील आमदार अभ्यास दौरा करून माहिती संकलन करतात. या दौऱ्यात आमदारांचे आचरण कसे असावे हे ठरवण्यासाठी समिती बनवण्यात आली आहे. या समितीत सभागृहातील वरिष्ठ सदस्यांचा समावेश करण्यात आला आहे. या समितीत माजी विधानसभा अध्यक्ष दिलीप वळसे पाटील, माजी सभापती रामराजे नाईक निंबाळकर यांचाही समावेश आहे. ही समिती एक




नियमावली तयार करेल त्यानुसार सदस्यांचे आचरण दौऱ्यात कसे असणारे हे ठरवले जाईल. काही महिन्यांपूर्वी धुळे येथे विधिमंडळाची अंदाज समिती दौऱ्यावर आलेली असताना या समितीचे अध्यक्ष अर्जुन खोतकर यांच्या कथित पीएच्या शासकीय खोलीतून १ कोटी ८० लाख सापडले होते. या घटनेने मोठी खळबळ उडाली होती. त्यात विधिमंडळ कक्ष अधिकारी किशोर पाटील यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली.

किशोर पाटील हे खोतकर यांचे पीए म्हणून धुळ्याला गेले होते. या घटनेनंतर विधिमंडळ समित्यांच्या एकूणच वर्तनाचे स्वरुप निश्चित करण्यासाठी नीतिमूल्य समिती (एथिक्स कमिटी) स्थापन करण्यात येईल असं जाहीर करण्यात आले होते.

# पोलीस नक्षल चकमकीत सी-६० जवान दीपक मडावी यांना वीरमरण

**गडचिरोली :** (समर्थ गांवकरी)

भामरागड उपविभागातील छत्तीसगड सीमेलगतच्या अबुझमाड जंगल परिसरात पोलीस आणि नक्षलवाद्यांमध्ये झालेल्या भीषण चकमकीत आतापर्यंत तीन नक्षलवाद्यांना कंठस्नान घालण्यात जवानांना यश आले आहे. मात्र, या कारवाईदरम्यान नक्षलवाद्यांशी लढताना सी-६० पथकाचे जवान दीपक चिन्ना मडावी यांना वीरमरण आले, तर अन्य एक जवान जखमी झाला आहे. ३ फेब्रुवारीच्या संध्याकाळी नक्षलवाद्यांच्या 'कंपनी क्रमांक १०' आणि छत्तीसगडमधील एका दलमची हालचाल असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर गडचिरोली पोलिसांनी ही मोहीम हाती घेतली होती. सी-६० च्या १४ पथकांनी रात्रीच जंगलात कूच केली होती. काल दिवसभर चाललेल्या या धुमश्चक्रीत पोलिसांनी नक्षलवाद्यांचे



दोन तळ उद्ध्वस्त केले होते. गुरुवारी अतिरिक्त पथके आणि सीआरपीएफच्या तुकडीला पाचारण केल्यानंतर हा संघर्ष अधिक तीव्र झाला. या मोहिमेत आज सकाळी आणखी दोन नक्षलवाद्यांचे मृतदेह पोलिसांच्या हाती लागले आहेत. यामध्ये एका पुरुष आणि एका महिला नक्षलवाद्याचा समावेश आहे. आतापर्यंत या चकमकीत एकूण ३ नक्षलवादी (२ पुरुष व १ महिला) ठार झाले असून, त्यांच्याकडून एक एके-४७ आणि एक एसएलआर रायफल जप्त करण्यात आली आहे.

# मंत्र्यांची वनविश्रामगृहात मांसाहाराची मागणी; सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाला धक्का...

**नागपूर:** (समर्थ गांवकरी)

वनखात्याची विश्रामगृहे आणि निरीक्षण बंगले हे प्रामुख्याने वनाधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी जंगल व वन्यजीवांचे संवर्धन, संरक्षण आणि व्यवस्थापनाशी संबंधित कर्तव्ये पार पाडण्यासाठी आहेत. त्यामुळे पर्यटनाला चालना देण्यासाठी थेट किंवा अप्रत्यक्षपणे कोणत्याही खासगी किंवा व्यावसायिक संस्था किंवा व्यक्तीच्या सुपूर्द केल्या जाऊ शकत नाही, असा निकाल ५ जुलै २०१८ ला सर्वोच्च न्यायालयाने एका याचिकेवर दिला.

मात्र, राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांवी विश्रामगृहात मांसाहार सुरू करण्याची मागणी म्हणजे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन असल्याची चर्चा वनखात्याच्या वर्तुळात आहे. राखीव वनक्षेत्र, वन्यजीव अभयारण्य आणि व्याघ्रप्रकल्पात



असलेल्या वनखात्याच्या विश्रामगृहात मांसाहाराला परवानगी देण्यात यावी, असे पत्र राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी काही महिन्यांपूर्वी वनमंत्री गणेश नाईक यांना दिले. या पत्रानंतर वनखात्यात खळबळ उडाली आणि अधिकारीही पेचात पडले. तत्कालीन वनमंत्री बबनराव पाचपुते यांनी २००४-२००५ मध्ये एक धोरणात्मक निर्णय घेतला. या निर्णयानुसार राज्यातील वनखात्याच्या अखत्यारितील विश्रामगृहात मांसाहार आणि मद्यपानास बंदी घालण्यात आली. हा धोरणात्मक निर्णय नंतर शासन आदेशात परावर्तीत करण्यात आला.

# रोज छापे, रोज पंचनामे आणि दुसऱ्याच दिवशी पुन्हा सुरू होणारे धंदे

- हा प्रकार कधी थांबणार?
- समशेरपूर–शिरगाव–इंदुरी फाट्यावर कारवाई कधी?
- खऱ्या बोक्यांवर कारवाईच नाही; जखम शेंडीला, मलम गुडघ्याला!

**अकोले :** (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यात अवैध दारूविरोधात सुरू असलेल्या कारवायांकडे पाहिले असता एकच चित्र वारंवार समोर येत आहे, खरे गुन्हेगार मोकाट आणि कारवाई मात्र किरकोळ विक्रेत्यांवर होताना दिसते,

जिथे प्रत्यक्षात मोठ्या प्रमाणावर अवैध दारू विक्री, साठवणूक व वाहतूक सुरू आहे, त्या समशेरपूर–शिरगाव फाटा व इंदुरी फाटा परिसरात मात्र अद्याप ठोस कारवाई झालेली दिसत नाही.

प्रशासनाकडून काही ठिकाणी छापे टाकले जात असले तरी त्या कारवाया



केवळ दाखवण्यासाठी असल्याचा संशय अधिक बळावतो आहे. मोठ्या प्रमाणावर अवैध दारूचा पुरवठा ज्या ठिकाणांहून होतो, जेथे कायमस्वरूपी धंदे उघडपणे सुरू आहेत, तिथे हात घालण्याचे धाडस कुणी करताना दिसत नाही. त्यामुळेच नागरिकांमध्ये "जखम शेंडीला आणि मलम गुडघ्याला" अशीच अवस्था असल्याची भावना निर्माण झाली आहे.

समशेरपूर–शिरगाव फाटा व इंदुरी फाटा हे परिसर अनेकदा अवैध दारू विक्रीचे हॉटस्पॉट म्हणून ओळखले जातात. येथे खुलेआम दारू विक्री सुरू असताना, वारंवार तक्रारी होऊनही पोलीस व एक्साइज विभागाकडून ठोस, मोठी कारवाई का होत नाही, हा प्रश्न आता सर्वसामान्य जनतेला पडला आहे.

खऱ्या बोक्यांवर कारवाई करण्याचे नेमके काय अडथळे आहेत?

की मग कुणाचा तरी वरदहस्त या धंद्यांच्या पाठीशी आहे? अशी चर्चा आता उघडपणे होत आहे.

जर अवैध दारूचा कणा मोडायचा असेल, तर किरकोळ विक्रेत्यांवर नव्हे तर मुख्य सूत्रधार, पुरवठादार आणि संरक्षण देणाऱ्यांवर थेट कारवाई होणे गरजेचे आहे. अन्यथा रोज छापे, रोज पंचनामे आणि दुसऱ्याच दिवशी पुन्हा सुरू होणारे धंदे— हा प्रकार कधीच थांबणार नाही.

अकोले तालुक्यातील नागरिकांची मागणी स्पष्ट आहे—

दाखवण्यापुरत्या नव्हे तर निर्णायक कारवाया करा.

समशेरपूर–शिरगाव फाटा आणि इंदुरी फाटा येथे तातडीने कठोर कारवाई करा.


खऱ्या गुन्हेगारांवर हात घाला, तेव्हाच अवैध दारूचा प्रश्न सुटेल!

# दादांचा शेवटचा व्हिडीओ, ४ दिवस आधी 'देवगिरी'वर बनवला

## जनतेला काय केलं होतं आवाहन?

**मुंबई :** (समर्थ गांवकरी)

७ फेब्रुवारी रोजी जिल्हा परिषदांसाठी मतदान होत असून त्यासंदर्भात मतदारांना आवाहन केलेला अजित पवार यांचा विमान अपघातापूर्वी बनवलेला व्हिडीओ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने गुरुवारी प्रसिद्ध केला. यामध्ये अजित पवार यांनी विकासाच्या प्रवासात राष्ट्रवादीला साथ द्या, असे आवाहन केलेले आहे. १ मिटीन ४८ सेकंदाचा हा व्हिडीओ आहे. अजित पवार यांच्या देवगिरी या शासकीय निवासस्थानी तो चित्रीत केलेला आहे. २४ जानेवारी रोजी हा व्हिडीओ बनवला आणि २८ जानेवारी रोजी अजित पवार यांचे विमान अपघातामध्ये निधन झाले. शनिवारी जिल्हा परिषदांसाठी मतदान होत आहे. त्याच्या पार्श्वभूमीवर पक्षाने सदर व्हीडिओ समाज माध्यमांवर प्रसिद्ध केला. जिल्हा परिषद या ग्रामविकासाची किल्ली आहे. तुमच्या गावाचा, जिल्ह्याचा विकास कोण करणार आहे हे निवडण्याची तुम्हाला संधी आली आहे. मी शब्दाचा पक्का व कामाचा माणुस आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने कायमच ग्रामीण विकासाला प्राधान्य दिलेले आहे. या निवडणुकीत राष्ट्रवादीच्या उमेदवारांना निवडुन द्या. विकासाच्या या प्रवासात तुम्ही सहभागी



व्हा. तुमचे एक मत गावचे भविष्य उज्वल करु शकते, असे अजित पवार यांनी या व्हिडीओमध्ये आवाहन केलेले आहे. अजित पवार २८ जानेवारी रोजी मुंबई ते बारामती असा विमान प्रवास करत होते. त्यांच्या विमानाला सकाळी ८.३० च्या सुमारास अपघात झाला. त्या दिवशी पवार यांच्या बारामती तालुक्यात चार सभा होत्या. महानगरपालिका निवडणुकीत राष्ट्रवादीची मोठी हार झाली होती. नगरपंचायती-नगरपरिषदांमध्ये ११०० आणि महानगरपालिकांमध्ये १६८ नगरसेवक राष्ट्रवादीचे विजयी होऊ शकले होते.

# अतिरिक्त शिक्षक, शिक्षकेतरांचे समायोजन...

- अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाला अखेर मुहूर्त
- ३१ मार्चपर्यंत प्रक्रिया पूर्ण करण्याचे शिक्षण विभागाचे आदेश

**पुणे :** (समर्थ गांवकरी)

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांसह खासगी अनुदानित, अंशतः अनुदानित शाळांतील अतिरिक्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समायोजनाची प्रक्रिया राबवली जाणार आहे. त्यासाठी शिक्षण संचालनालयाकडून तयार करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार १३ फेब्रुवारी रोजी तात्पुरती यादी जाहीर केली जाणार असून, ३१ मार्चपर्यंत समायोजन प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी या बाबतच्या सूचना परिपत्रकाद्वारे दिल्या आहेत. सन २०२५-२६ची संचमान्यता १५ मार्च २०२४च्या शासन निर्णयातील सुधारित संचमान्यता निकषांनुसार २३ ऑक्टोबर रोजी पटावर नोंद असलेल्या आधार वैध विद्यार्थिसंख्येनुसार डिसेंबर २०२५मध्ये शिक्षणाधिकाऱ्यांना त्यांच्या ऑनलाइन खात्यात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. अतिरिक्त शिक्षक समायोजनाच्या कार्यपद्धतीविरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिका उच्च न्यायालयाने निकाली काढल्या आहेत. त्यामुळे समायोजनावरील स्थगिती उठवण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर, २०२५-२६च्या संचमान्यतेनुसार रिक्त, अतिरिक्त पदांची पडताळणी करून अतिरिक्त ठरणारे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांची समायोजन प्रक्रिया वेळापत्रकानुसार राबववण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत. समायोजनासाठी निश्चित करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार सन २०२५-२६च्या संचमान्यतेमध्ये अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समायोजनाबाबतच्या रिक्त जागा संवर्ग, विषय, इयत्तानिहाय आणि अतिरिक्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांची तात्पुरती यादी १३ फेब्रुवारीपर्यंत जाहीर करावी.

# भारतीय संस्कृती जतन करणे काळाची गरज : आदिनाथ मंगेशकर

## पुण्यात 'हेरिटेज यात्रा-२०२६'चा दिमाखदार प्रारंभ

पुणे : (समर्थ गांवकरी)

भारतीय संस्कृती ही जगातील सर्वात प्राचीन, समृद्ध आणि विविधतेत एकता दर्शवणारी संस्कृती आहे. वसुधैव कुटुंबकम् हा उदात्त विचार, शांतता, सहिष्णुता, आदर आणि आध्यात्मिक मूल्यांवर आधारित जीवनपद्धती ही भारतीय संस्कृतीची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे पाश्चिमात्य संस्कृती समजावून घेत असताना भारतीय संस्कृतीचे जतन करणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी 'हेरिटेज यात्रा' सारखे उपक्रम अत्यंत महत्त्वाचे आहेत. येथे पारंपरिक हस्तकलेपासून ऑगमेंटेड रिॲलिटी (एआर)सारख्या आधुनिक तंत्रज्ञानापर्यंतचा प्रवास या महोत्सवात अनुभवता येतो. पुणे महानगरपालिका आणि एमआयटी एडीटी विद्यापीठाचा हा उपक्रम कौतुकास्पद आहे, असे मत प्रसिद्ध संगीततज्ज्ञ आदिनाथ मंगेशकर यांनी व्यक्त केले. ते भारतीय संस्कृतीचा वारसा जतन करण्याच्या उद्देशाने पुणे महानगरपालिका आणि एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठ (एडीटी) यांच्या संयुक्त विद्यमाने सिंहगड रोड येथील पु. ल. देशपांडे कलाग्राम येथे आयोजित 'हेरिटेज यात्रा-२०२६' या महोत्सवाच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलत होते. याप्रसंगी फिल्म्स विभाग व दूरदर्शनचे माजी महासंचालक मुकेश शर्मा, पुणे महानगरपालिकेच्या सांस्कृतिक विभागाचे प्रशासकीय अधिकारी राजेश कामठे, एमआयटी एडीटी



विद्यापीठाच्या कार्यकारी संचालक ज्योती ढाकणे-कराड, कुलगुरू डॉ. राजेश एस., प्र-कुलगुरू डॉ. नचिकेत ठाकूर, महोत्सवाच्या निमंत्रक डॉ. अश्विनी पेठे, डॉ. अतुल पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजेश एस. यांनी भविष्यातील आव्हानांना सामोरे जाताना आपला वारसा आणि संस्कृती यांना सर्वोच्च प्राधान्य देण्याची गरज व्यक्त केली. ते म्हणाले की, आपण आपल्या वैदिक संस्कृतीच्या मुळांकडे पुन्हा वळणे आणि तरुण पिढीमध्ये जिज्ञासू वृत्ती विकसित करणे ही काळाची गरज आहे. भविष्याकडे झेप घेताना आपल्या संस्कृतीचा पाया भक्कम असणे अत्यंत आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले. पुणे महानगरपालिकेच्या सांस्कृतिक विभागाचे प्रशासकीय अधिकारी राजेश कामठे यांनी एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या या पुढाकाराचे आणि पुणे महानगरपालिकेसोबतच्या सहकार्याचे विशेष कौतुक केले. 'हेरिटेज यात्रा' हा उपक्रम आगामी काळात अधिक व्यापक आणि भव्य होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सांस्कृतिक वारसा लाभलेले शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे शहरात अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांना पुणे महानगरपालिका आणि येथील कलाग्राम केंद्र नेहमीच पूर्ण पाठबळ देईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या कार्यकारी संचालक ज्योती ढाकणे-कराड यांनी कला ही भारतीयांची जीवनपद्धती असल्याचे सांगत, जागतिकीकरणाच्या युगातही परंपरा न विसरण्याचे आवाहन केले. तसेच विद्यार्थ्यांनी कला क्षेत्राकडे करिअर म्हणून पाहावे आणि आपल्या कौशल्याचा उपयोग देशाच्या प्रगतीसाठी करावा, असेही त्यांनी नमूद केले. उद्‌घाटनाच्या पहिल्याच दिवशी विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी पारंपरिक विटांची भिंत तयार करणे, आभासी ऐतिहासिक सफर (Immersive Heritage), मातीकाम (Pottery), नाट्य कार्यशाळा, गोंड पेंटिंग, श्लोक पठण, वारली चित्रकला आणि सामुदायिक विणकाम यांसारख्या उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला. ७ फेब्रुवारीपर्यंत चालणाऱ्या या विनामूल्य उपक्रमात पुणेकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### शनिवारवाड्यापासून 'हेरिटेज वॉक'चे आयोजन

या महोत्सवाचे आकर्षण असलेल्या 'हेरिटेज प्लेलँड'मध्ये विद्यार्थ्यांसह पुणेकरांना विविध खेळांच्या माध्यमातून इतिहासाची सफर घडविण्यात येणार आहे. उद्‌घाटनाच्या पहिल्याच दिवशी शैक्षणिक तज्ज्ञांनी तयार केलेल्या या खेळांमध्ये विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहाने सहभाग घेतला. यामध्ये प्रामुख्याने 'महामिस्टरी', 'डार्ट अँड डिस्कव्हर', 'अराउंड इंडिया' आणि 'मिस्टरी बॉक्स पझल' या खेळांनी विद्यार्थ्यांची मने जिंकली. विशेषतः 'महाराष्ट्रासाठी स्वतःच्या चलनाची रचना करणे' (Creating Currency Design for Maharashtra) या उपक्रमात विद्यार्थ्यांनी आपली सर्जनशीलता दाखवत महाराष्ट्राच्या अस्मितेचे दर्शन घडवणारी चलने रेखाटली. महोत्सवाचाच भाग म्हणून ६ व ७ फेब्रुवारी रोजी सकाळी ८.०० वाजता शनिवारवाड्यापासून 'हेरिटेज वॉक' आयोजित करण्यात आला आहे.

---

## पूर्णा अभयारण्यात दुर्मिळ 'ब्लॅक-हेडेड बंटिंग' पक्ष्याचे दर्शन; पक्षीप्रेमींमध्ये आनंदाची लाट

डांग : (समर्थ गांवकरी)

निसर्गसंपदेने नटलेल्या डांग जिल्ह्यातील पूर्णा वन्यजीव अभयारण्यात पक्षीविश्वासाठी अत्यंत आनंददायी अशी नोंद समोर आली आहे. अभयारण्य परिसरात अतिशय दुर्मिळ मानला जाणारा 'ब्लॅक-हेडेड बंटिंग' (Black-headed Bunting) हा पक्षी आढळून आला आहे. या पक्ष्याचे शास्त्रीय नाव Emberiza melanocephala असे आहे. डांगच्या जंगलात या प्रजातीचे दर्शन क्वचितच होत असल्याने ही नोंद स्थानिक जैवविविधतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. पूर्णा वन्यजीव अभयारण्याचे प्रमाणित पर्यटक मार्गदर्शक तसेच महाल गावचे रहिवासी विपुल वळवी यांनी जंगलभ्रमंतीदरम्यान या दुर्मिळ पक्ष्याचे निरीक्षण केले. विपुल वळवी हे अनेक वर्षांपासून वन्यजीव



क्षेत्रात कार्यरत असून दुर्मिळ पक्षीप्रजाती व त्यांच्या अधिवासांच्या शोधात त्यांचे विशेष योगदान आहे. अभयारण्यात ठराविक मार्गावर भ्रमण करत असताना त्यांची नजर या वैशिष्ट्यपूर्ण पक्ष्यावर पडली. जरी हे दृश्य अल्पकाळासाठी दिसले असले तरी पक्ष्याच्या ठळक शारीरिक वैशिष्ट्यांवरून आणि वर्तनावरून त्यांनी आत्मविश्वासाने ओळख निश्चित केली. विशेष म्हणजे या दुर्मिळ क्षणाचे छायाचित्रणही करण्यात आले असून, ते अधिकृत पुष्टीसाठी महत्त्वपूर्ण पुरावा ठरत आहे. डांग जिल्ह्यात 'ब्लॅक-हेडेड बंटिंग' सारख्या स्थलांतरित पक्ष्याची नोंद होणे हे पूर्णा अभयारण्याच्या पर्यावरणीय महत्त्वावर शिक्कामोर्तब करणारे आहे. तज्ज्ञांच्या मते, अशा दुर्मिळ पक्ष्यांची उपस्थिती दर्शवते की पूर्णाचे जंगल स्थलांतरित पक्ष्यांसाठी सुरक्षित व अनुकूल अधिवास उपलब्ध करून देत आहे. सदर नोंद आता स्थानिक वनाधिकारी व पक्षीतज्ज्ञांकडे तपासणीसाठी पाठवण्यात आली असून, अधिकृत वन्यजीव नोंदीत समाविष्ट करण्याची प्रक्रिया सुरू आहे. डांगच्या घनदाट जंगलात होणाऱ्या अशा दुर्मिळ नोंदी पर्यटनवृद्धी व पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने आशादायक ठरत असून, विपुल वळवी यांसारख्या स्थानिक तरुणांच्या योगदानामुळे डांगची लपलेली जैवविविधता आज जगासमोर येत आहे, ही वनविभागासाठीही अभिमानाची बाबत आहे.

---

## नगर शहरात शिक्षिकेची साडेपाच लाखांची फसवणूक

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

गुगलवर लिंकला रेटिंग देऊन नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून सायबर भामट्यांनी एका शिक्षिकेला तब्बल ५ लाख ४५ हजार ९६८ रुपयांचा गंडा घातला आहे. याप्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आगरकर मळा परिसरात राहणाऱ्या ३९ वर्षीय शिक्षिकेला टेलिग्राम आयडीवरून संपर्क करण्यात आला होता. आरोपींनी त्यांना गुगलवर लिंकला रेटिंग देण्याचे टास्क दिले आणि त्यातून मोठा नफा मिळेल असे आमिष दाखवले.

---

## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करून वाढदिवस साजरा

राजूर : (समर्थ गांवकरी)

श्री. विठ्ठल दगडू बांडे गुरूजी यांचा 57 वा वाढदिवस नवभारत छात्र निवास राजूर, सर्वोदय विद्यार्थी वसतिगृह राजूर, श्रीमती सावित्रीबाई मदन कन्यानिवास राजूर येथे वसतिगृहात सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी यांच्या समवेत साजरा करण्यात आला. विठ्ठल बांडे गुरुजी यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन अधिक्षक मच्छिंद्र ढगे यांनी वाढदिवसाच्या शुभेच्छा देऊन सत्कार केला.यांचा 57 वा वाढदिवस वसतिगृहातील आदिवासी भागातील गोरगरीब विद्यार्थी, विद्यार्थिनी यांच्या समवेत साजरा केला. अनेक जण आपला वाढदिवस बाहेरील हॉटेलमध्ये किंवा इतर ठिकाणी आपापल्या पद्धतीने साजरा करतात. पण विठ्ठल बांडे गुरुजी हे आपला वाढदिवस हा वसतिगृहातच साजरा करत असतात. मुळातच बांडे गुरुजी



यांचे सर्व शिक्षण वसतिगृहात झालेले असल्यामुळे त्यांना परिस्थितीची पूर्ण जाणीव व कल्पना आहे. दरवर्षी वसतिगृहातील मुले,मुली यांना ते गिफ्ट देतात. याही वर्षी या वाढदिवसानिमित्त वसतिगृहातील सर्व एकूण 315 मुले, मुली यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. विठ्ठल बांडे गुरुजी यांना वसतिगृहाचे विद्यार्थी मोठे झाले पाहिजे, शिकले पाहिजे, उच्च पदावर गेले पाहिजे, ही तळमळ त्यांची पहिल्यापासून आहे. त्यांनी मागील वर्षी 2024/ 25 मध्ये इयत्ता दहावी मध्ये प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे 1)सदगीर प्रतीक्षा शिवाजी 90.40 2) मधे तुषार शांताराम 84% या दोन वसतिगृहात प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी 251 रुपये बक्षीस दिले.अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये विठ्ठल बांडे गुरुजी यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. घरामध्ये कोणाचेही शिक्षण नसताना आपल्या जिद्दीने, कष्टाने, चिकाटीने, मेहनतीने ते आज मुख्याध्यापक म्हणून जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा मान्हेरे ता.अकोले जि. अहिल्यानगर येथे कार्यरत आहे इ.पहिली पासून ते डी.एड पर्यंतचे शिक्षण आई-वडिलांपासून दूर वसतिगृहात राहून पूर्ण केले असल्याने त्यांना वसतिगृहाच्या मुलांविषयी आस्था आहे. ते दरवर्षी वसतिगृहात येऊन आपला वाढदिवस साध्या पद्धतीने साजरा करतात. आजही विठ्ठल बांडे गुरुजी ज्या ज्या गावात शिक्षण म्हणून सेवा करतात त्या गावातील प्राथमिक शाळेतील सर्व मुला मुलींना दरवर्षी वाढदिवसानिमित्त मिष्टान्न गोड जेवण तसेच शालोपयोगी साहित्य भेट देत असतात. ते दरवर्षी त्यांचा वाढदिवस मुलांमध्ये जाऊन फार मोठेपणा न दाखवता साध्या पद्धतीने साजरा करतात. मुले हीच देवाघरची फुले आहेत असे मानतात. वसतिगृहातील मुले मुली यांनी सरांना शुभेच्छा देऊन आपापले मनोगत सादर केले.

---

## आहवा-शिवघाट मार्गावर दिवसाढवळ्या दुचाकीस्वारावर बिबट्याचा जीवघेणा हल्ला

### परिसरात भीतीचे वातावरण

पेठा : (समर्थ गांवकरी)

आहवाच्या शिवघाट मार्गावर शिळेवर (दगडावर) दिवसाढवळ्या बसलेला बिबट्या दिसल्याचे व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाले होते. निसर्गसंपन्न डांग जिल्ह्यात गेल्या काही काळापासून वन्यजीव आणि मानव यांच्यातील संघर्षाच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. याच पार्श्वभूमीवर डांगचे मुख्य ठिकाण असलेल्या आहवा शहराजवळील प्रसिद्ध शिवघाट मार्गावर बिबट्याने एका दुचाकीस्वारावर अचानक हल्ला केल्याची गंभीर घटना घडली असून, त्यामुळे स्थानिक नागरिक व पर्यटकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आहवाच्या सनसेट कॉलनीत राहणारे ३६ वर्षीय देवेंद्रभाई आर. भगरिया हे दुचाकीवरून शिवघाट मार्गाने जात असताना रस्त्यालगतच्या झुडपात दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक त्यांच्यावर झडप घातली. या हल्ल्यात बिबट्याच्या पंज्यांमुळे देवेंद्रभाई गंभीर जखमी झाले. हल्ल्यानंतर बिबट्या तात्काळ शिवघाटच्या वरच्या बाजूला असलेल्या दाट जंगलात पसार झाला.

विशेष म्हणजे, या घटनेच्या काही वेळ आधीच सकाळी सुमारे ९.१५ वाजण्याच्या सुमारास हाच बिबट्या शिवघाट परिसरात एका शिळेवर आराम करत बसलेला दिसून आला होता. त्या वेळी रस्त्यावरून जाणाऱ्या अनेक वाहनचालकांनी बिबट्याचे दृश्य मोबाइलमध्ये कैद करून त्याचे व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल केले होते. मुख्य मार्गालगत आणि



मानवी वस्तीच्या इतक्या जवळ वन्यप्राणी दिसणे हे प्रवाशांच्या सुरक्षेसाठी गंभीर बाब ठरत आहे.

जखमी अवस्थेत रक्तस्राव होत असलेल्या देवेंद्रभाईंना तातडीने आहवा सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. सध्या ते रुग्णालयाच्या वॉर्ड क्रमांक १२५ मध्ये वैद्यकीय देखरेखीखाली उपचार घेत आहेत. सुदैवाने त्यांचा जीव वाचला असला, तरी या घटनेमुळे वनविभागाची चिंता वाढली आहे.

घटनेची माहिती मिळताच आहवा पश्चिम रेंजचे आर.एफ.ओ. विनय पवार आणि त्यांची टीम तात्काळ घटनास्थळी दाखल झाली. बिबट्याच्या हालचाली समजून घेण्यासाठी पायांचे ठसे व परिसराची तपासणी करण्यात येत आहे. शिवघाट परिसरात वनविभागाकडून कडक नजर ठेवण्यात येत असून, स्थानिक नागरिक व पर्यटकांनी या मार्गावरून प्रवास करताना अत्यंत सावधगिरी बाळगावी, तसेच रात्री उशिरा किंवा पहाटे एकट्याने ये-जा करू नये, असे आवाहन वनविभागाने केले आहे.

डांगच्या जंगलात बिबट्याची वाढती सक्रियता लक्षात घेता मानवी सुरक्षेसाठी बिबट्याला पिंजऱ्यात पकडणे यासह कठोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी आता नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

---

## नेत्यांनी घेतली हरकत

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर येथील महानगरपालिकेच्या महापौर निवडीला राज्यातील ओबीसी संघटानेच्या नेत्यांनी हरकत घेतली आहे. ओबीसी महिलांसाठी राखीव असलेल्या या जागेवर ओबीसी जातीतील घटकांना रोटेशननुसार संधी द्यायला हवी, असे त्यांचे म्हणने आहे. पुण्यात पत्रकार परिषद घेऊन या नेत्यांनी भूमिका मांडली आहे. महापौरपदाची निवडणूक झाल्यावर निव्हडणूक आयोगाकडे तक्रार करणार असल्याचे सांगण्यात आले. अहिल्यानगरचे महापौरपद ओबीसी महिलेसाठी राखीव आहे. तेथे राष्ट्रवादी काँग्रेसच्या ज्योती गाडे यांची उमेदवारी युतीकडून जाहीर झाली असून त्यांचा एकमेव अर्ज आहे. गाडे या ओबीसीमधील कुणबी घटकातील आहेत.

---


## श्रीक्षेत्र सोमेश्वर मंदिर परिसरात विशेष स्वच्छता अभियानाचे आयोजन : नगरसेवक सनी निम्हण

पुणे : (समर्थ गांवकरी)

महाशिवरात्रीच्या पवित्र पर्वाच्या पार्श्वभूमीवर श्रीक्षेत्र सोमेश्वर मंदिर येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही लाखो भाविक दर्शनासाठी येण्याची अपेक्षा आहे. या भाविकांना स्वच्छ, सुरक्षित व भक्तीमय वातावरण उपलब्ध व्हावे या उद्देशाने श्रीक्षेत्र सोमेश्वर मंदिर परिसरात विशेष स्वच्छता व साफसफाई अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे.

हे स्वच्छता अभियान रविवार, दि. ०८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७.०० वाजता श्रीक्षेत्र सोमेश्वर मंदिर, पुणे येथे पार पडणार आहे. या उपक्रमाचे आयोजन श्रीक्षेत्र सोमेश्वर देवस्थान ट्रस्ट यांच्या वतीने करण्यात आले आहे.

या उपक्रमाबाबत माहिती देताना श्री. सनी विनायक निम्हण (विश्वस्त, श्रीक्षेत्र सोमेश्वर



देवस्थान ट्रस्ट तसेच नगरसेवक, पुणे महानगरपालिका) यांनी सांगितले की, महाशिवरात्री निमित्त मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होत असते. भाविकांना स्वच्छ व पवित्र वातावरणात दर्शन घेता यावे, तसेच आरोग्यदायी आणि सुरक्षित परिसर उपलब्ध व्हावा, हा या स्वच्छता अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

या अभियानात नागरिकांनी, शिवभक्तांनी तसेच स्वयंसेवकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. सामूहिक सहभागातून मंदिर परिसर अधिक स्वच्छ, सुंदर आणि भक्तिमय करण्याचा संकल्प या उपक्रमातून साकार होणार आहे.

---

# यंग शेफ ऑलिम्पियाडच्या १२ व्या आवृत्तीत पुण्यात आंतरराष्ट्रीय शेफ्सचा सहभाग

पुणे : (समर्थ गांवकरी)

इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट (IIHM) तर्फे 'यंग शेफ ऑलिम्पियाड २०२६' (YCO) या जगातील विद्यार्थी शेफ्ससाठीच्या सर्वात मोठ्या पाककला स्पर्धेची १२वी आवृत्ती आयोजित करण्यात येत आहे. या पाककलेच्या माध्यमातून एकात्मता, ऐक्य आणि शाश्वततेचा उत्सव साजरा करणारा हा उपक्रम विविध सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेल्या राष्ट्रांमध्ये ऐतिहासिकदृष्ट्या मैत्रीचे सेतू बांधत आला आहे. यंदा या व्यासपीठावर जगभरातील ४० हून अधिक देशांमधील विद्यार्थी शेफ्स एकत्र येत असून, तरुण व्यावसायिकांसाठीची ही जगातील सर्वात व्यापक आणि समावेशक पाककला स्पर्धा ठरत आहे.




वायसीओ (YCO ) २०२६ ची संकल्पना हि 'आर्टीफिशीअल इंटेलिजन्स (AI)' च्या माध्यमातून जागतिक पाककला वारसा जतन करणे' अशी असून, आतिथ्य शिक्षणात तंत्रज्ञानाचा जबाबदारीने समावेश करताना मानवी कौशल्य, सर्जनशीलता आणि सांस्कृतिक समज यांचे महत्त्व केंद्रस्थानी राखण्याची आयआयएचएम (IIHM) ची व्यापक दृष्टी यातून प्रतिबिंबित होते. विविध खंडांतील वेगवेगळ्या पाकपरंपरांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या स्पर्धकांच्या सहभागामुळे वायसीओ (YCO) २०२६' पाककलेला संस्कृतींमधील प्रभावी दुवा म्हणून अधोरेखित करते आणि तरुण पाककला प्रतिभेसाठी भारताची जागतिक भेटीचे केंद्र म्हणून भूमिका अधिक दृढ करते.

या स्पर्धेची प्राथमिक फेरी ३ फेब्रुवारी २०२६ रोजी बंगळुरू, दिल्ली, पुणे, हैदराबाद आणि गोवा या पाच शहरांमध्ये पार पडेल, तर पुण्यातील प्राथमिक फेरीत इटली, मेक्सिको, कॅनडा, मलेशिया, सायप्रस, इजिप्त आणि श्रीलंका अशा सात देशांमधील स्पर्धकांनी सहभाग घेतला. या फेरीत स्पर्धकांना 'मॉडर्न ब्रॅसेरी/बिस्ट्रो' शैलीतील मुख्य पदार्थ म्हणून भेटकी मासा तसेच गरम किंवा थंड प्रकारातील व्हेगन डेझर्ट तयार करून चार प्लेट्समध्ये सादर करण्याचे आव्हान देण्यात आले.

तसेच मुख्य पदार्थ म्हणून क्रीमयुक्त मटर प्युरीवर पॅन-सिअर केलेला भेटकी फिश फिले सादर करण्यात आले, ज्यासोबत सेलरी, ॲस्पॅरॅगस (ही एक भाजी / वनस्पती आहे जी प्रामुख्याने युरोप, उत्तर आफ्रिका आणि पश्चिम आशियात आढळते), भाजलेले टोमॅटो व चेरी टोमॅटो देण्यात आले होते. या पदार्थावर हर्ब बटर सॉसची हलकी भुरळ घालण्यात आली होती. तर डेझर्टमध्ये गरम किंवा थंड प्रकारातील व्हेगन चीजकेक सादर करण्यात आले, ज्यावर काजूचे फिलिंग, प्रीमियम कोको चव व सिझनिंगसाठी बिस्किटाचा वापर करण्यात आला असून शेवटी व्हेगन काजू फिलिंगने त्याची आकर्षक मांडणी करण्यात आली.

या प्राथमिक फेरीसाठी परीक्षक म्हणून आंतरराष्ट्रीय कीर्तीचे नामवंत शेफ उपस्थित होते. यामध्ये वेस्टमिन्स्टर किंग्सवे कॉलेज, लंडन येथील हॉस्पिटॅलिटी आणि क्युलिनरी आर्ट्स स्कूलचे प्रमुख शेफ पॉल जर्विस; बुड्ल्स, लंडन येथील एक्झिक्युटिव्ह शेफ स्टीफन कार्टर; जागतिक पातळीवरील प्रसिद्ध पेस्ट्री तज्ज्ञ व कॅलेबॉ अँबॅसिडर शेफ सारा हार्टनेट; जुमेराह कार्लटन टॉवर, नाइट्सब्रिज येथील एक्झिक्युटिव्ह शेफ मारिओ परेरा; क्युलिनरी आणि जागतिक एफ अँड बी क्षेत्रातील द्रष्टे शेफ शॉन केनवर्थी; तसेच द फर्न हॉटेल अँड रिसॉर्ट्स (लंडन), कॉर्पोरेट एफ अँड बी चे शेफ रितेश सेन यांचा समावेश होता.

या प्रसंगी बोलताना इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट (IIHM) चे अध्यक्ष तसेच वायसीओ (YCO ) चे अध्यक्ष डॉ. सुबोर्नो बोस यांनी सांगितले, "यंग शेफ ऑलिम्पियाड हा केवळ पाककलेशी संबंधित कार्यक्रम नाही, तर स्वयंपाकाच्या माध्यमातून राष्ट्रांना एकत्र आणणाऱ्या एकात्म शक्तीचा तो सशक्त प्रत्यय आहे. नवकल्पना, कौशल्य आणि सर्जनशीलतेच्या जोरावर तसेच पाककलेतील चव व स्वाद यांच्या समतोलातून तरुण शेफ्स उज्ज्वल उद्याची वाटचाल घडवतील, असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे."

यंग शेफ ऑलिम्पियाड २०२६' अंतर्गत सहभागी स्पर्धक 'युनायटेड वर्ल्ड ऑफ यंग शेफ्स' (UWYC) या विशेष उपक्रमाचाही भाग होते. मैत्री, सौहार्द आणि ऐक्याचा संदेश देणाऱ्या या उपक्रमातून तीव्र स्पर्धेच्या वातावरणातही पाककलेच्या माध्यमातून एकोप्याचा अनुभव यंग शेफ ऑलिम्पियन्सना घेता आला. प्राथमिक फेरीच्या एक दिवस आधी पुणेसह विविध शहरांमध्ये UWYC चे आयोजन करण्यात आले होते. पुण्यात हा कार्यक्रम रॅडिसन ब्लू, पुणे खराडी येथे पार पडला.

यावेळी स्पर्धकांनी आपल्या देशांचे पारंपरिक व वैशिष्ट्यपूर्ण खाद्यपदार्थ सादर केले. इटालियन स्पॅघेटी बोलोनेझ, मलेशियन नासी लेमक, कॅनेडियन पुटीन, मेक्सिकन टॅकोज, सायप्रसचे सुव्लाकी, इजिप्शियन कोशारी, श्रीलंकन चिकन करी यांसह विविध देशांतील पदार्थांचा पाहुण्यांनी आस्वाद घेतला.

# ‘व्हाईटकोट सेलिब्रिटी क्रिकेट लीग २०२६’ची घोषणा

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारतातील पहिली डॉक्टर-सेलिब्रिटी टी-20 लेदर बॉल क्रिकेट लीग असलेल्या व्हाईटकोट सेलिब्रिटी क्रिकेट लीग (WCCL) 2026 ची अधिकृत घोषणा आज करण्यात आली. “जिथे आरोग्यसेवा, क्रिकेट आणि ग्लॅमर एकत्र येतात” या संकल्पनेवर आधारित ही अनोखी लीग डॉक्टरांच्या कर्तृत्वाला सन्मान देतानाच दर्जेदार क्रिकेट मनोरंजन देणार आहे अशी माहिती या लीगचे संस्थापक व व्यवस्थापकीय संचालक सचिन वाघमारे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी सीए अखिल कुमार, दीपेश शेरे (WCCL ऑपरेशन्स आणि मार्केटिंग) उपस्थित होते. पुढे बोलताना सचिन वाघमारे म्हणाले, ही भारतातील पहिली अशी लीग आहे, जिथे देशभरातील डॉक्टर आणि नामवंत सेलिब्रिटी एकाच




व्यासपीठावर खेळताना दिसतील. WCCL ट्रायल्सला देशभरातून 5,000 हून अधिक डॉक्टरांनी नोंदणी केली असून, भारतात प्रथमच आयोजित होत असलेल्या डॉक्टरांच्या व्यावसायिक क्रिकेट लीगसाठी देशभरात ग्राउंड ट्रायल्स पूर्ण झाल्या असून निवड प्रक्रिया सुरू आहे. पुणे, मुंबई, अहमदाबादसह विविध शहरांमध्ये मोठ्या उत्साहात चाचण्या घेतल्या जात आहेत. या लीगमध्ये 10 डॉक्टर-नेतृत्वाखालील संघ असतील. प्रत्येक संघात 1 ते 2 सेलिब्रिटी खेळाडू सहभागी होतील. पुण्यात राऊंड-रॉबिन पद्धतीने लीग सामने खेळवले जातील, तर उपांत्य फेरी आणि अंतिम सामना देशाच्या बाहेर होणार आहे. 200 ते 500 निवडक डॉक्टरांचा भव्य लिलाव (ग्रँड ऑक्शन) पुण्यात पार पडणार असून तो थेट प्रक्षेपित केला जाईल. या लीगमध्ये केवळ भारतीय डॉक्टरच नव्हे तर यूकेसह परदेशातील डॉक्टरही सहभागी होत आहेत. शहरी भागासोबतच ग्रामीण व खेडेगावातील डॉक्टर-खेळाडूंनी मोठ्या संख्येने नोंदणी केली आहे. तसेच लीगमध्ये अभिनेता सिद्धार्थ जाधव, संजय जाधव, प्रवीण तरडे यांसह अनेक नामवंत कलाकार सहभागी होणार आहेत. ‘व्हाईटकोट सेलिब्रिटी क्रिकेट लीग 2026’ची प्राथमिक फेरी 4 ते 8 मे 2026 दरम्यान दोन गटात साखळी सामन्याने होणार आहे. हे सामने पुण्यात तर सेमी फायनल आणि फायनल सामने दुबई येथे खेळविण्यात येणार आहेत. डॉक्टर्सना त्यांच्या वैद्यकीय सेवेपलीकडे जाऊन वेगळ्या स्वरूपात सन्मान या लीगच्या माध्यमातून होणार आहे. डॉक्टर खेळाडू इतर कोणत्याही IPL क्रिकेटपटूपेक्षा कमी नाहीत. त्यांच्या कौशल्य, शिस्त आणि जिद्दीमुळे ही लीग देशातील क्रीडा विश्वात नवा इतिहास घडवेल, असे आयोजकांनी स्पष्ट केले. सध्या मुंबई मेडस्टार्स, पुणे, अहमदाबाद, चेन्नई, पंजाब, दिल्ली, बेंगळुरू, हैदराबाद, जयपूर आणि कोलकाता या शहरांच्या नावाने संघ तयार करण्यात येत आहेत. काही संघांच्या स्लॉट्स अद्याप खुले असून, इच्छुक गुंतवणूकदार व संघमालकांनी आयोजकांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.







ठाणे : भारत मुक्ती मोर्चा, बहुजन क्रांती मोर्चा, राष्ट्रीय पिछडा वर्ग मोर्चा व राष्ट्रीय परिवर्तन मोर्चा (ठाणे जिल्हा) यांच्या संयुक्त विद्यमाने ओडिशा येथील राष्ट्रीय अधिवेशन रद्द करण्याच्या षडयंत्राविरोधात आज ठाण्यात रॅली काढून निषेध नोंदविण्यात आला व ठाणे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांना निवेदन देण्यात आले. ( फोटो - संतोष पडवळ )

# श्री कच्छ वागड लोहाणा मंडळातर्फे रांदल माताजीच्या लोट्याचे भक्तिमय आयोजन!

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

दि. ५ फेब्रुवारी २०२६ रोजी शेठ एन.के.टी. सभागृह, ठाणे येथे श्री कच्छ वागड लोहाणा मंडळातर्फे रांदल माताजीच्या लोट्याचे भक्तिभावाने आयोजन करण्यात आले होते. या धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमास समाजातील मान्यवर व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

या कार्यक्रमाला समाजरत्न श्री नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्यासोबत श्री नटवरलाल वीरजीभाई ठक्कर आणि श्री राजेंद्र पुराणिक यांचीही उपस्थिती लाभली.

कार्यक्रमात श्री कच्छ वागड लोहाणा मंडळाच्या भगिनी सौ. हेतल ठक्कर, श्रीमती कल्पना ठक्कर, श्रीमती तरुणा ठक्कर,



श्रीमती गीता ठक्कर, श्रीमती मीना ठक्कर, श्रीमती हिना ठक्कर यांच्यासह समाजातील इतर महिलाही मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. या प्रसंगी आयोजन समितीच्या वतीने नानजीभाई ठक्कर यांचा पुष्पहार व शाल देऊन सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना नानजीभाई ठक्कर म्हणाले की, “अशा धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे समाजातील एकता वृद्धिंगत होते तसेच परंपरा जिवंत राहतात.” यशस्वी आयोजनाबद्दल त्यांनी मंडळाचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

यावेळी रांदल मातेची विशेष पूजा करण्यात आली. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी रांदल मातेच्या लोट्याची पारंपरिक यात्रा भक्तिभावात पार पडली. संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते. कार्यक्रमाचे आयोजन शिस्तबद्ध व उत्साहात पार पडले असून उपस्थित भाविकांनी समाधान व्यक्त केले.

# फेसबुकवरील मैत्री पडली महागात

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

फेसबुकवर झालेल्या ओळखीचा फायदा घेऊन एका तरुणाने विवाहितेची फसवणूक केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. लग्नाचे आमिष दाखवून पीडितेवर अत्याचार केल्यानंतर संशयित आरोपी तिला वाऱ्यावर सोडून पसार झाला आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अहिल्यानगर शहरातील स्टेशन रोड परिसरातील रहिवासी असलेल्या एका विवाहितेची ओळख सन २०२४ मध्ये फेसबुकच्या माध्यमातून जालना जिल्ह्यातील सारंगपूर येथील राजू भाऊराव काकडे ऊर्फ सुनील पटेल याच्याशी झाली होती. या ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले आणि संशयित आरोपीने तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले.

# राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत कन्या विद्यालयाची सुवर्ण कामगिरी

**श्रीगोंदा तालुका: (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा येथील श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयाच्या क्रीडापटूंनी राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत सुवर्ण यश संपादन केले आहे. महाबळेश्वर येथे नुकत्याच पार पडलेल्या नॅशनल थाई बॉक्सिंग स्पर्धेत विद्यालयातील विद्यार्थिनींनी घवघवीत यश मिळवून पदकांवर आपले नाव कोरले.

या स्पर्धेत
कु. वैष्णवी ज्ञानदेव भागवत – सुवर्णपदक,
कु. शर्वरी योगेश टकले – सुवर्णपदक,
कु. श्रावणी भारत भगाडे – रौप्यपदक,
कु. तेजस्वी शहाजी शिंदे – रौप्यपदक,
कु. जान्हवी भागवत वायभासे – रौप्यपदक,
कु. गौरी गणेश लोखंडे – कांस्यपदक,
कु. तेजश्री पोपट मोटे – कांस्यपदक

असे उल्लेखनीय यश मिळवले आहे.



या सर्व यशस्वी विद्यार्थिनींची नेपाळ येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय थाई बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली असून ही बाब विद्यालयासाठी अभिमानास्पद ठरली आहे. विद्यार्थिनींना क्रीडाशिक्षक श्री. किरण कोकणी व ग्रँडमास्टर समीर पांढरकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

तसेच दिनांक ३ फेब्रुवारी रोजी महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय येथे आयोजित शालेय राज्यस्तरीय हाफ किडो बॉक्सिंग स्पर्धेतही विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी उत्कृष्ट कामगिरी केली. या स्पर्धेत
कु. वैष्णवी नामदेव भागवत – सुवर्णपदक,
कु. शर्वरी योगेश टकले – सुवर्णपदक,
कु. वृषाली प्रकाश मोटे – सुवर्णपदक,
कु. श्रावणी भारत भगाडे – रौप्यपदक

असे घवघवीत यश मिळवले.

याशिवाय हाफ किडो बॉक्सिंगच्या राज्यस्तरीय स्पर्धेत
कु. धनश्री विठ्ठल कुरुमकर – १ सुवर्णपदक व १ रौप्यपदक,
कु. आराध्या संतोष कुरुमकर – १ सुवर्णपदक व १ कांस्यपदक,
कु. गौरी गणेश लोखंडे – कांस्यपदक

अशी पदकांची कमाई करण्यात आली. या यशस्वी विद्यार्थिनी व मार्गदर्शक शिक्षकांचा महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. महादेव जरे यांच्या शुभहस्ते सन्मान करण्यात आला.

# प्रहारच्या जिल्हा उपाध्यक्षपदी सुरेश सुपेकर

## तालुकाध्यक्ष वामन भदे यांची निवड

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**




प्रहार जनशक्ति पक्षाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी श्रीगोंदा येथील उद्योजक सुरेशराव गणपतराव सुपेकर यांची तर तालुकाध्यक्षपदी वामनराव भदे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. निवडीचे पत्र जिल्हाध्यक्ष विनोद परदेशी यांनी नुतन पदाधिकारी यांना दिले आहे. शनिवार दि.31 रोजी श्रीगोंदा येथील शासकीय विश्रामगृह येथे दुपारी दोन वाजता प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चुभाऊ कडू यांच्या आदेशाने संपर्क प्रमुख विजय राऊत यांच्या अध्यक्षतेखाली पक्षाची बैठक झाली. यामध्ये उद्योजक सुरेश सुपेकर यांनी अनेक वर्षे पक्षाचे तालुकाध्यक्ष म्हणून प्रभावी काम केल्याने त्यांना जिल्हा उपाध्यक्षपदी बढती देण्यात आली. आणि त्यांच्या पक्षाचे जुने सहकारी वामनराव भदे यांना तालुकाध्यक्ष म्हणून संधी देण्यात आली. दोघाही पदाधिकारी यांना मान्यवरांच्या उपस्थितीत जिल्हाध्यक्ष परदेशी यांनी निवडीचे पत्र दिले. यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष परदेशी म्हणाले कि पक्ष प्रमुख बच्चुभाऊ कडू यांच्या मार्गदर्शनाखाली आपण सर्वजन काम करित आहोत, त्यामुळे भविष्यात प्रहार जनशक्ती पक्षाचा विस्तार जिल्ह्यात आणि तालुक्यात जास्त होण्यासाठी आपण काही बदल केले आहेत.कारण याच माध्यमातून आपल्याला समाजातील गोरगरीब जनतेचे प्रश्न सोडवून वंचितांना न्याय द्यायचा आहे. निवड केलेले जिल्हा उपाध्यक्ष सुपेकर,आणि तालुका अध्यक्ष भदे हे पदाला नक्की न्याय देतील यांची मला खात्री आहे.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते जयदीप मगर, प्रहारचे संघटक विजय भंडारी,युवा अध्यक्ष सागर जाधव, सावता हिरवे,धनराज भोपळे,नानाभाऊ ठवाळ,नितीन निकम,ज्ञानदेव भैलुमे गणेश बोके यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व संघटनेचे कार्यकर्ते हजर होते.

शेवटी तालुका अध्यक्ष वामनराव भदे यांनी सर्वाचे स्वागत करुण आभार मानले.

# नीलेश लंके यांच्यासह १२ जणांची मुक्तता

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

नगर–पुणे महामार्गावर सुपा चौक येथे करण्यात आलेल्या रस्ता रोको आंदोलनप्रकरणी विद्यमान खासदार नीलेश लंके यांच्यासह सर्व १२ आरोपींची नगर येथील न्यायालयाने पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली आहे. अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी मा. जी. जी. सोनी यांनी दिलेल्या निर्णयानुसार,आरोपींविरोधात दाखल करण्यात आलेले भारतीय दंड संहितेचे कलम ३४१ व १८८, राष्ट्रीय महामार्ग कायदा १९५६ चे कलम ८(ब) तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये कलम १३५ अंतर्गतचे आरोप संशयमुक्त पुराव्यांद्वारे सिद्ध होऊ शकलेले नाहीत. न्यायालयाने नमूद केले की, आंदोलना दरम्यान कोणालाही इजा झाल्याचा अथवा सार्वजनिक शांततेला बाधा निर्माण झाल्याचा कोणताही ठोस पुरावा सादर करण्यात आलेला नाही.

# टायगर ग्रुपच्या माध्यमातून 'माणुसकीचे दर्शन'

■ निराधार व्यक्तीला मिळाला हक्काचा आधार

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

'माणुसकी हीच जात आणि सेवा हाच धर्म' हे ब्रीदवाक्य जपत टायगर ग्रुपने पुन्हा एकदा समाजासमोर एक संवेदनशील आदर्श उभा केला आहे. अनेक दिवसांपासून रस्त्यावर अत्यंत दयनीय अवस्थेत बसलेल्या एका निराधार व्यक्तीला टायगर ग्रुपचे नाशिक जिल्हा उपाध्यक्ष सचिन जाधव यांनी माणुसकीचा हात देत मदतीचा आधार दिला आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून नाशिकमध्ये एक निराधार व्यक्ती रस्त्यावर बसून, भिक मागून आपले पोट भरत होती. अस्वच्छता आणि हलाखीच्या परिस्थितीमुळे त्या व्यक्तीची अवस्था अत्यंत दयनीय झाली होती. या व्यक्तीवर जाधव यांची नजर पडली. केवळ



सहानुभूती न दाखवता, आपण या व्यक्तीसाठी काहीतरी केले पाहिजे या भावनेतून त्यांनी तातडीने पावले उचलली. जाधव यांनी त्या व्यक्तीजवळ जाऊन प्रेमाने तिची समजूत काढली. त्यानंतर त्या व्यक्तीला घेऊन जाऊन स्वच्छ आंघोळ घातली.

वाढलेले केस आणि नखे कापून त्यांची स्वच्छता केली. थंडीचा कडाका लक्षात घेता त्यांना नवीन कपडे, चप्पल, कानटोपी, स्वेटर आणि ब्लँकेट दिले. शेवटी त्यांना पोटभर जेवण दिले, या कृतीमुळे त्या व्यक्तीच्या डोळ्यांतून आनंदाश्रू तरळले.सामाजिक टायगर ग्रुपचे संस्थापक वस्ताद जालिंदर जाधव, राष्ट्रीय अध्यक्ष तानाजी जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सचिन जाधव हे सातत्याने विविध सामाजिक उपक्रम राबवत असतात. गोरगरीब जनतेला न्याय मिळवून देणे आणि संकटकाळात धावून जाणे ही टायगर ग्रुपची कार्यपद्धती त्यांनी या कृतीतून पुन्हा एकदा सिद्ध केली आहे.

या कार्याबद्दल संपूर्ण नाशिक जिल्ह्यातून सचिन जाधव यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. "कलीयुगात कोणी कोणासाठी काही करत नाही, पण अशा परिस्थितीतही माणुसकी जपणारे कार्यकर्ते समाजात प्रेरणास्थान ठरत आहेत," अशा भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

# जिल्हा परिषद शाळेतील गरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**(समर्थ गांवकरी)**

कुंडाणे (ओ) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना विश्व मानव रुहानी केंद्र यांच्या वतीने शालेय सर्व आवश्यक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला मोठा आधार मिळाला असून पालक व ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. या कार्यक्रमप्रसंगी परदेशी सर यांनी विश्व मानव रुहानी संस्थेचे उद्दिष्ट स्पष्ट करताना सांगितले की, संस्थेने माझ्यावर मोठी जबाबदारी सोपवली आहे. विश्व मानव रुहानी संस्था ही कायमस्वरूपी गोरगरीब विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सामाजिक उन्नतीसाठी काम करत असून, भविष्यातही अशा उपक्रमांद्वारे गरजू विद्यार्थ्यांना मदत केली जाणार आहे. यावेळी कुंडाणे गावाचे उपसरपंच रवींद्र आहेर यांनी संस्थेच्या या उपक्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत सांगितले की, “आमच्या शाळेसाठी करण्यात आलेल्या या मोलाच्या मदतीबद्दल आम्ही विश्व मानव रुहानी केंद्राचे मनापासून आभार मानतो.

SHRI GURU GOBIND SINGHJI INSTITUTE OF ENGINEERING & TECHNLOGY, VISHNUPURI, NANDED-431606 (M.S.)

E-Tender Notice

Director, SGGSIE&T Nanded invites online E-Tender for Laying drainage line in institute premises Tender ID No.2026_DTEDM_1273798_4 The tender is available on portal https://mahatenders.gov.in/nicgep/app from 06/02/2026 last date for purchase of tender is 24/02/2026 upto 2.00 p.m.

Sd/-
DIRECTOR

# वघई–आहवा येथे काँग्रेसची ‘जन आक्रोश यात्रा’

## महागाई व आदिवासी अन्यायाच्या मुद्द्यावर अमित चावडांचा सरकारवर जोरदार हल्लाबोल

**डांग : (समर्थ गांवकरी)**

डांग जिल्ह्याच्या प्रवेशद्वारासमान असलेल्या वघई येथील ऐतिहासिक गांधी मैदानावर आज गुजरात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष अमित चावडा यांच्या अध्यक्षतेखाली “जन आक्रोश यात्रा – परिवर्तनाचा शंखनाद” या भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने झालेल्या जाहीर सभेत बोलताना अमित चावडांनी राज्यातील भाजप सरकारवर तीव्र शब्दांत टीका केली.

चावडा म्हणाले की, गुजरातची जनता गेल्या तीन दशकांतील एकाधिकारशाही सत्तेला आता कंटाळली आहे. आकाशाला भिडलेली महागाई, वाढती बेरोजगारी आणि ढासळती जीवनशैली यामुळे सामान्य नागरिक होरपळून निघत आहे. सरकार रोटी, कपडा आणि मकान यांसारख्या मूलभूत गरजा पुरवण्यात अपयशी ठरले असून, केवळ विविध योजनांच्या लांबच लांब रांगांमध्ये जनतेला उभे ठेवून त्रास दिला जात आहे, असा आरोप त्यांनी केला. तसेच मताधिकारासारख्या घटनात्मक हक्कांवर घाला घालण्यासाठी सरकारकडून षड्यंत्र रचले जात असल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला.

राज्यातील सामाजिक अधःपतन आणि भ्रष्टाचारावर भाष्य करताना त्यांनी सांगितले की, दारू व अंमली पदार्थांच्या अवैध व्यवसायामुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होत असून सरकार याकडे डोळेझाक करत आहे. शासकीय यंत्रणांमध्ये व्याप्त भ्रष्टाचारामुळे सामान्य नागरिकांची कामे रखडत असल्याची टीकाही त्यांनी केली.

आदिवासी भागांतील प्रश्नांवर सरकारची धोरणे झोडून काढताना अमित चावडा म्हणाले की, पार–तापी लिंक प्रकल्प, भारतमाला महामार्ग, झिंक खनन आणि उकाई धरणावरील फ्लोटिंग सोलार प्रकल्पांच्या नावाखाली आदिवासींच्या पवित्र ‘जल, जंगल आणि जमीन’ यावर अतिक्रमण केले जात आहे. हजारो वनजमिनीचे दावे प्रशासनात प्रलंबित असतानाही त्यांचा निपटारा न करता आदिवासींच्या जमिनी मोठ्या उद्योगपतींच्या घशात घातल्या जात असल्याचा आरोप त्यांनी केला आणि हे कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाही, असा इशारा दिला.

शिक्षण आणि रोजगाराच्या ढासळत्या परिस्थितीवर चिंता व्यक्त करताना त्यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील प्राथमिक शाळा ‘मर्ज’ करण्याच्या नावाखाली बंद केल्या जात आहेत, तर मनरेगा योजनेतून मिळणारा रोजगार सातत्याने कमी होत आहे. शहरांमध्ये सुरू असलेल्या बुलडोझर कारवाईमुळे गरीब व मजुरांवर होत असलेला अन्यायही त्यांनी अमानवी असल्याचे सांगितले.

सभेच्या शेवटी अमित



चावडांनी उपस्थित नागरिकांना आपल्या हक्क आणि अधिकारांच्या संरक्षणासाठी *“जन आक्रोश यात्रे”*त सहभागी होऊन आगामी काळात परिवर्तन घडवून आणण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमाला अखिल भारतीय काँग्रेस समितीचे सचिव श्रीनिवास बी. व्ही., डॉ. तुषार चौधरी, माजी आमदार मंगळभाई गावित, माजी खासदार किशन पटेल, जिल्हाध्यक्ष स्नेहल ठाकरे, गुजरात आदिवासी काँग्रेसचे अध्यक्ष राजू पारघी, महामंत्री संदीप मांगरोळा यांच्यासह अनेक वरिष्ठ नेते उपस्थित होते. तसेच स्थानिक नेते गौतमभाई पटेल, तबररेज अहमद (बब्बलु), सूर्यकांत गावित, मुकेश पटेल, युवा नेते तुषार कामडी आणि मोठ्या संख्येने काँग्रेस कार्यकर्त्यांनी उपस्थिती लावून शक्तिप्रदर्शन केले.

# अमर रहे. अमर रहे. अजित दादा अमर रहे.



महाराष्ट्राचे लाडके नेते
उपमुख्यमंत्री, राष्ट्रीय अध्यक्ष

## कै. अजितदादा पवार

यांना

भावपूर्ण श्रद्धांजली

---

**कृषी उत्पन्न बाजार समिती, अकोले**
ता.अकोले, जि.अहिल्यानगर

मार्गदर्शक
मा.आ.डॉ.किरण लहामटे

श्री.भानुदास तिकांडे — सभापती
श्री.रोहिदास भोर — उपसभापती
श्री.राजेंद्र जगताप — सचिव

**सन्मा.संचालक मंडळ :-** शिवनाथ विठ्ठल आरज, योगेश गजानन आरोटे, रुपजी धोंडीबा कचरे, भास्कर बाळाजी खांडगे, सचिन हौशिराम रंधे, ईश्वर सोमनाथ वाकचौरे, स्वाती तुकाराम कोरडे, मंगल अनिल भांगरे, बाळासाहेब गणपत सावंत, चक्रधर भिमाजी सदगीर, अब्दुल महंमद इनामदार, किरण हरिभाऊ कानकाटे, मारुती परशुराम वैद्य, अमोल नागनाथ वाघमारे

---

**श्री. प्रकाश मुक्ताळकर**
(साहेब) (गुणवंत अधिकारी)
निमनदार क्र.२, उपअधिक्षक भुमिअभिलेख
ता. अकोले, जि. अहिल्यानगर

---

**अर्थवेद**
ग्रामीण बिगर शेती
सह.पतसंस्था मर्या; अकोले
ता.अकोले, जि.अहमदनगर

प्रा.बबनराव महाले — संस्थापक चेअरमन
मा.केशवराव नाईकवाडी — व्हा.चेअरमन

सन्मा. संचालक मंडळ
किसनराव मंडलिक, दशरथ कोटकर, गोरक्ष वाकचौरे, सुनील धुमाळ, चंदन भारती, अशोक पथवे, भाऊसाहेब गोडसे, सौ.अंजुता कडलग, सौ.शर्मिला मालुंजकर

मा.श्री.किरण गजे (कार्यकारी संचालक)
सर्व सभासद, ठेवीदार, कर्जदार, हितचिंतक व कर्मचारी वृंद

---



**इंजि. भरत पारधी**
सामाजिक कार्यकर्ते
कोतूळ विभाग, अकोले तालुका
ता. अकोले, जि. अहिल्यानगर

---

**अतुलशेठ नवले**
सामाजिक कार्यकर्ते
अकोले, ता. अकोले,
जि. अहिल्यानगर

---

**अगस्ती ग्रामीण बिगर शेती सह पतसंस्था मर्या, अकोले**
सन्मा. संचालक मंडळ
तसेच कर्मचारी वृंद
अकोले
ता. अकोले, जि. अहिल्यानगर

---

**मा.शेखर हनुमंत गोल्हार**
**मा.दिपक राजा गोल्हार**
**मा.कृष्णा पाटील उर्फ लक्ष्मण गुड्डील**
सामाजिक कार्यकर्ते
ह.मु.ठाणे
मु.पो.हनुमंत, १३९६, इंदिरानगर,
अंकाली, बेळगाव (कर्नाटक) ५९१२१३

---

**जनलक्ष्मी ग्रामीण बिगर शेती सह पतसंस्था मर्या, अकोले**
सन्मा. संचालक मंडळ
तसेच कर्मचारी वृंद
अकोले
ता. अकोले, जि. अहिल्यानगर

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# कर्मचाऱ्यांचे चार महिन्यांचे वेतन प्रलंबित

## काम बंद आंदोलनाचा इशारा



**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

नांदेड पाणीपुरवठा व स्वच्छता विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-2 व जल जीवन मिशन अंतर्गत जिल्हा परिषदांमध्ये कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे माहे ऑक्टोबर २०२५ ते जानेवारी २०२६ या कालावधीतील मानधन अद्याप अदा करण्यात आलेले नाही. त्यामुळे राज्यभर तीव्र असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असून, मानधनाची तातडीने अदायगी न झाल्यास आजपासून काम बंद आंदोलन करण्याचा इशारा कर्मचाऱ्यांनी दिला आहे.

राज्यातील सर्व जिल्हा परिषदांमध्ये जिल्हा व तालुकास्तरावर कार्यरत असलेले हे कंत्राटी कर्मचारी ग्रामपंचायतस्तरावरील प्रत्यक्ष अंमलबजावणी, क्षेत्रीय तपासणी, लाभार्थी समन्वय, ऑनलाईन नोंदी, अहवाल सादरीकरण तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरील नियोजन व देखरेखीचे अत्यंत महत्त्वाचे काम सांभाळत आहेत. या कर्मचाऱ्यांच्या माध्यमातूनच योजनांची प्रभावी व सलग अंमलबजावणी होत असल्याचे प्रशासनाकडूनही मान्य करण्यात येते. मात्र, गेल्या चार महिन्यांपासून मानधन न मिळाल्यामुळे कर्मचाऱ्यांवर मोठा आर्थिक व मानसिक ताण निर्माण झाला असून, त्याचा थेट परिणाम कर्मचा-यांच्या मनोबलावर होत आहे. विशेष म्हणजे वेतन प्रलंबित असतानाही हे कर्मचारी नियमितपणे कामावर उपस्थित राहून आपली जबाबदारी पार पाडत आहेत. कर्मचाऱ्यांच्या म्हणण्यानुसार मानधन प्रलंबित राहण्यास जिल्हा परिषद स्तरावरील प्रशासन जबाबदार नसून, राज्यस्तरावरील निधी वितरण व प्रशासकीय प्रक्रियांमधील विलंबामुळे ही परिस्थिती उध्दभवली आहे.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य पाणी व स्वच्छता शासकीय कंत्राटी कर्मचारी कृती समितीच्या वतीने आज जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांना निवेदन सादर करण्यात आले. मानधनाची अदायगी न झाल्यास स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत सन २०२५ .२६ चा वार्षिक कृती आराखडा (AIP) सादर केला जाणार नसल्याचा इशाराही कर्मचाऱ्यांनी दिला आहे. तसेच क्षेत्रीय तपासणी, ऑनलाईन नोंदी, अहवाल सादरीकरण व दैनंदिन प्रशासकीय कामकाजावर याचा गंभीर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

ही बाब केवळ आर्थिक नसून मानवी व प्रशासकीय दृष्टिकोनातून अत्यंत संवेदनशील असल्याचे नमूद करत, राज्य शासनाने तातडीने हस्तक्षेप करून कंत्राटी कर्मचाऱ्यांचे प्रलंबित मानधन त्वरीत अदा करावे, अशी जोरदार मागणी कर्मचाऱ्यांच्या संघटनांकडून करण्यात येत आहे. अन्यथा दि. ९ फेब्रुवारी पासून राज्य संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

## काकड़े परिवाराच्यावतीने विश्वशांती महायज्ञ व पट्टाभिषेक रजत महोत्सवातील शोभा यात्रेतील भाविकांना चहा व पाणी बॉटल वाटप




**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

विश्वात शांती, सौहार्द आणि सनातन ।धर्माच्या मूल्यांचे संवर्धन व्हावे, या उद्देशाने नांदेड येथे भव्य विश्वशांती महायज्ञ व पट्टाभिषेक रजत महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. हा धार्मिक व आध्यात्मिक सोहळा दि. ५ फेब्रुवारी ते १२ फेब्रुवारी या कालावधीत श्री गुरू दशमुखाश्रम भीमाशंकर नगर, गोपाळचावडी येथे सुरू असून या नांदेड आनंद नगर येथून भव्य शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते हे यात्रे करू कौठा परिसरात उपस्थित राहीले असता नगरसेविका सुलोचना धोंडीबाराव काकड़े परिवाराच्या वतीने चहा पानी बॉटल चे वाटप करण्यात आले

दि. ५ फेब्रुवारी ते १२ फेब्रुवारी या कालावधीत श्री गुरू दशमुखाश्रम भीमाशंकर नगर, गोपाळचावडी, नवीन नांदेड येथे होणार असून, भव्य शोभा यात्राचे आयोजन करण्यात आले ही यात्रा श्री केदारेश्वर सत्संग भवन आनंदनगर येथून नवामोढ़ा आय टी आय शिवजी पुतळा मार्गे रविनगर कौठा येथे आली यावेळी नगरसेविका सुलोचना धोंडीबाराव काकड़े यांच्या परिवारच्या वतीने चहा व पानी बॉटल वाटपाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी माजी जी प सदस्य गंगाप्रसाद काकड़े नगरसेवक अभिषेक सौदे, निरंजन काकड़े ,, गणेश काकडे .विनोद काकड़े . संजय पांडे यांची उपस्थिती होती शोभा यात्रेतील भाविक भक्तांनी चहाचा स्वाद घेतला.

## डिसेंट फाउंडेशनच्या माध्यमातून जुन्नर तालुक्यातील हजारो नेत्र रुग्णांना मिळाली नवी दृष्टी

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**




जुन्नर ता:-जुन्नर, जि:-पुणे येथील गुरुवर्य कोंडाजी बाबा डेरे आश्रमामध्ये डिसेंट फाउंडेशन पुणे,शंकरा आय हॉस्पिटल पनवेल व विघ्नहर्ता मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल नारायणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी,मोतीबिंदू शस्त्रक्रिया आरोग्य तपासणी शिबिर संपन्न झाले. या शिबिराला परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.या शिबिरात एकूण १८४ नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली तर ४० रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी शंकरा आय हॉस्पिटल पनवेल येथे पाठविण्यात आले. गेल्या दोन वर्षांत डिसेंट फाउंडेशनच्या माध्यमातून जुन्नर तालुक्यात पाच हजार मोतीबिंदू शस्त्रक्रियांचा टप्पा पूर्ण झाला असून सर्व शस्त्रक्रिया अत्यंत यशस्वीरीत्या पार पडल्या आहेत.

शिबिरात रुग्णांना तपासणी,मोतीबिंदू शस्त्रक्रिया, प्रवास, निवास,जेवण,चष्मा व एक महिन्यांची औषधे या सर्व सुविधा पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात येतात. तसेच तिरळेपणावरील शस्त्रक्रिया देखील मोफत करण्यात येतात,अशी माहिती डिसेंट फाउंडेशनचे संस्थाप जितेंद्र बिडवई यांनी दिली.

यावप्रसंगी डिसेंट फाऊंडेशनचे संस्थापक जितेंद्र बिडवई,सचिव डॉ.एफ.बी.आतार,संचालक आदिनाथ चव्हाण,माऊली आय केअर चे विलास बोन्द्रे ,गणेश मेहेर , सत्यवान खंडागळे, शंकर भिसे ,छाया पाटील, ,प्रकाश नवले,सतीश शिंदे,शंकरा आय हॉस्पिटलचे समन्वयक ज्योती पाटील ,तज्ञ डॉक्टर व त्यांची संपूर्ण टीम ,विघ्नहर्ता मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल चे डॉ अशितोष बोळीज, दयानंद गायकवाड व त्यांची सर्व टीम व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## घरात घुसून महिलेचा विनयभंग

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

शहरातील केडगाव भागात एका विवाहितेचा विनयभंग केल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. घर उघडे असल्याचा फायदा घेऊन एका व्यक्तीने घरात प्रवेश केला आणि झोपलेल्या पीडित महिलेचे हात धरून अश्लिल वक्तव्य केले. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी (३ फेब्रुवारी) दुपारी साडेचार वाजेच्या सुमारास पीडित महिला राहत्या घरी हॉलमध्ये विश्रांती घेत होती. घराचा दरवाजा अर्धवट उघडा होता. यावेळी विकी संधू (पूर्ण नाव माहिती नाही, रा. केडगाव) हा तरूण अनधिकृतपणे घरात शिरला. महिलेला कुणीतरी स्पर्श केल्याचे जाणवले, मात्र सासू उठवत असाव्यात या समजुतीने तिने दुर्लक्ष केले. मात्र, अचानक संधू याने तिचे दोन्ही हात पकडले आणि अश्लिल मागणी केली.

## शालेय राज्यस्तरीय हाफकिडो बॉक्सिंग स्पर्धा उत्साहात संपन्न

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**



महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, श्रीगोंदा येथे अहिल्यानगर जिल्हा हाफकिडो बॉक्सिंग असोसिएशन, जिल्हा क्रीडा अधिमहाराजाकारी कार्यालय अहिल्यानगर आणि श्रीगोंदा तालुका क्रीडा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २ व ३ फेब्रुवारी २०२६ रोजी शालेय राज्यस्तरीय हाफकिडो बॉक्सिंग स्पर्धांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या स्पर्धांमध्ये राज्यातील सहा विभागांमधून एकूण १२० खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

स्पर्धेच्या उद्‌घाटनप्रसंगी डॉ. सुदाम भुजबळ यांनी प्रास्ताविकातून स्पर्धेचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. बाबासाहेब भोसले होते. यावेळी अहिल्यानगर जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. तसेच तालुका क्रीडा अधिकारी दिलीप दिघे, राज्य क्रीडा मार्गदर्शक संतोष वाबळे आणि श्रीगोंदा नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा सुनिता खेतमाळीस यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. महादेव जरे व प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे यांनी हाफकिडो बॉक्सिंग या खेळाचा इतिहास, त्याचे महत्त्व आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात अशा स्पर्धांचे योगदान अधोरेखित केले.

याप्रसंगी हाफकिडो बॉक्सिंग महाराष्ट्र संघटनेचे जनरल सेक्रेटरी श्री. राज वागतकर, खजिनदार संतोष बसवंते, सचिन पवार, पुणे विभाग प्रमुख उमेश शिंदे, समीर पांढरकर, युवराज पवार तसेच सोलापूरचे शुभम यांनीही खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास जिमखाना प्रमुख प्रा. रमेश थोरात, प्रा. श्रीकांत थोरात, विभाग प्रमुख प्रा. रमेश भुजबळ, प्रा. उषा बोरुडे, प्रा. महेश गिरमकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेचे नियोजन अहिल्यानगर जिल्हा हाफकिडो बॉक्सिंग सेक्रेटरी शब्बीर पठाण, क्रीडा शिक्षक संजय डफळ व क्रीडा संचालिका कल्पना बागुल यांनी केले.

राज्यस्तरीय स्पर्धेत महाविद्यालयाचा खेळाडू प्रथमेश होले याने ७० किलो वजन गटात उत्कृष्ट कामगिरी करत तृतीय क्रमांक पटकावला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संजय फटे यांनी केले, तर आभार डॉ. नितीन थोरात यांनी मानले. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना आपले कौशल्य सादर करण्याची संधी मिळाली असून स्पर्धा यशस्वीपणे पार पडल्याबद्दल सर्व स्तरांतून समाधान व्यक्त करण्यात आले.

## मोहम्मद नगर परिसरात विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली



**भोकर : (समर्थ गांवकरी)**

भोकर नगरपरिषदेच्या वतीने सुरू असलेल्या स्वच्छता पंधरवडा कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर आज मोहम्मद नगर परिसरात विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेअंतर्गत परिसरातील रस्ते, गटारी व सार्वजनिक ठिकाणी साचलेला कचरा साफ करून परिसर स्वच्छ करण्यात आला. या स्वच्छता मोहिमेची पाहणी लोकनियुक्त नगराध्यक्ष भगवान दंडवे यांनी केली. यावेळी प्रभाग क्रमांक ९ चे कार्यतत्पर नगरसेवक संजय घंटलवार तसेच स्वच्छता व आरोग्य सभापती प्रा. डॉ. फेरोज इनामदार, दिलीप वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. नगराध्यक्ष भगवान दंडवे यांनी नागरिकांनी स्वच्छतेबाबत जागरूक राहून नगरपरिषदेला सहकार्य करावे, असे आवाहन केले. शहर स्वच्छ, सुंदर व आरोग्यदायी ठेवण्यासाठी स्वच्छता पंधरवड्याच्या माध्यमातून विविध भागांमध्ये अशाच प्रकारच्या मोहिमा राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. स्वच्छता मोहिमेमुळे मोहम्मद नगर परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून नगरपरिषदेच्या उपक्रमाचे स्वागत केले आहे.



पुणे जिल्ह्यातील खेड राजगुरुनगर तालुक्यातील तिर्थक्षेत्र आळंदी नगरपरिषद नगराध्यक्षा पदी प्रशांतदादा कुऱ्हाडे यांची निवड झाल्याबद्दल घड्याळ देऊन सन्मान करताना माजी नगरसेवक मनोहर दिवाणे व मित्रपरिवार.....

## किनवट स्थानकावर रेल्वे अधिकाऱ्यांना पत्रकार संघाचे निवेदन

**किनवट : (समर्थ गांवकरी)**



किनवट रेल्वे स्थानकावर दक्षिण मध्य रेल्वेचे जनरल मॅनेजर, नांदेड विभागीय व्यवस्थापक तसेच विविध वरिष्ठ अधिकारी यांच्या दौऱ्यादरम्यान किनवट पत्रकार संघाच्या पत्रकारांनी प्रवाशांच्या सोयीसाठी विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. किनवट हे दक्षिण मध्य रेल्वे मार्गावरील अत्यंत महत्त्वाचे तसेच रेल्वेला चांगले उत्पन्न देणारे स्थानक म्हणून ओळखले जाते. सध्या केंद्र शासनाच्या 'अमृत भारत' योजनेअंतर्गत स्थानकावर विविध विकासकामे सुरू आहेत. स्थानकाच्या विकासामुळे प्रवाशांना भविष्यात अधिक सुविधा उपलब्ध होण्याची अपेक्षा व्यक्त होत असतानाच, विद्यमान रेल्वे सेवा व गाड्यांच्या वेळांबाबत मात्र प्रवाशांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे पत्रकार संघाने निवेदनात नमूद केले आहे. पत्रकार संघाने दिलेल्या निवेदनामध्ये ट्रेन क्रमांक ५७६५४ या गाडीची किनवट येथून सुटण्याची वेळ सकाळी ५ ते ६ वाजण्याच्या दरम्यान करण्यात यावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. तसेच ट्रेन क्रमांक ७७६१६ (आदिलाबाद – पुर्णा) व ट्रेन क्रमांक ७७६१५ (पुर्णा – आदिलाबाद) या गाड्यांमधील विद्यमान बोगी काढून त्या ऐवजी सवारी गाडीच्या बोगी जोडण्यात याव्यात, अशी मागणीही करण्यात आली. यासोबतच पुणे – नांदेड अथवा हडपसर – नांदेड या गाडीचा विस्तार करून ती आदिलाबादपर्यंत चालविण्यात यावी, तसेच आदिलाबाद येथील पिट लाईनचे काम लवकर पूर्ण करून नांदेड येथे मुक्कामी असलेल्या गाड्या आदिलाबादपर्यंत विस्तारीत कराव्यात, अशी मागणीही पत्रकार संघाने निवेदनाद्वारे केली. दरम्यान, किनवट स्थानकाच्या पाहणीसाठी आलेल्या दक्षिण मध्य रेल्वेच्या जनरल मॅनेजर यांनी केवळ १५ मिनिटांतच आपला दौरा आटोपल्याने स्थानिक प्रवासी व नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत असल्याचेही समोर आले आहे. किनवटसारख्या महत्त्वाच्या स्थानकावरील समस्या व प्रवाशांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी अधिक वेळ देणे आवश्यक होते.

## निर्मलाबाई कांबळे यांना माता रमाई गणगोत पुरस्कार जाहीर

**कंधार: (समर्थ गांवकरी)**



त्यागमूर्ती माता रमाई जयंतीनिमित्त माता रमाई विचारमंच आणि माता रमाई जयंती मंडळ, जवळा दे ता.लोहा जि.नांदेड यांच्या वतीने विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान मातांना देण्यात येणारा माता रमाई गणगोत पुरस्कार कंधार येथील सामाजिक कार्यकर्त्या निर्मलाबाई त्र्यंबक कांबळे यांना जाहीर झाला आहे.

दरवर्षी त्यागमूर्ती माता रमाई जयंतीनिमित्त माता रमाई विचारमंच आणि माता रमाई जयंती मंडळ, जवळा दे ता.लोहा जि.नांदेड यांच्या वतीने दिले जाणारे माता रमाई गणगोत पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. यंदा विविध क्षेत्रातील ७ कर्तृत्ववान मातांना हे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. कंधार येथील ख्यातनाम पत्रकार राजेश्वर कांबळे यांच्या मातोश्री निर्मलाबाई कांबळे यांना माता रमाई गणगोत पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, पदक, शाल, पुष्पहार, असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. त्यागमूर्ती माता रमाई जयंतीदिनी शनिवारी, दि.७ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता जवळा दे ता.लोहा येथे जि.नांदेड येथे निर्मलाबाई कांबळे यांना माता रमाई गणगोत पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

निर्मलाबाई कांबळे या सामाजिक कार्यकर्त्या आहेत. प्रतिकूल परिस्थितीतही त्या पती आणि मुले यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिल्या. शिक्षण नसतानाही त्यांनी शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. तसेच आपल्या मुलांना उच्च शिक्षित केलं. त्यांना अठ्ठेचाळीस हजार रुपये किमतीची सोन्याची अंगठी सापडली होती. त्यांनी ती अंगठी प्रामाणिकपणे परत केली. या कार्याची दखल घेत त्यांना पुरस्काराने सन्मानित येणार आहे. निर्मलाबाई कांबळे यांना पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# ग्राम विकास मंडळ ओतूरच्या यशात सुवर्ण पान

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**




ग्राम विकास मंडळ,ओतूर व चैतन्य विद्यालय ओतूर यांचे संयुक्त विद्यमाने पुष्पावती विद्यालय डिंगोरचे मुख्याध्यापक शरद भिवा माळवे व चैतन्य विद्यालय ओतूरचे क्रीडा विभाग प्रमुख अमित गंगाधर झरेकर यांनी मास्टर गेम्स असोसिएशन महाराष्ट्र राज्य यांचे वतीने आयोजित क्रीडा स्पर्धेत सुवर्णमय कामगिरी करून थायलंड याठिकाणी होणाऱ्या आंतरराष्ट्रीय आशियाई स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल सत्कार समारंभाचे आयोजन ग्राम विकास मंडळ ओतूरचे अध्यक्ष अनिल तांबे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते.

अशी माहिती मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली. स्वर्गीय मीनाताई ठाकरे क्रीडा संकुल नाशिक या ठिकाणी नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय मास्टर गेम्स क्रीडा स्पर्धेत पुष्पावती विद्यालय डिंगोरचे मुख्याध्यापक शरद माळवे यांनी ५० ते ५५ वयोगटात १०० मीटर व लांब उडी या क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांक संपादन करून सुवर्णपदक मिळविले व चैतन्य विद्यालय ओतूरचे अमित झरेकर यांनी ३५ ते ४० या वयोगटात २०० मीटर धावणे या क्रीडा प्रकारात द्वितीय क्रमांक मिळवला. या दोघांची थायलंड या ठिकाणी मार्च महिन्यात होणाऱ्या आशियाई स्पर्धेसाठी निवड झाली. सत्काराला उत्तर देताना शरद माळवे व अमित झरेकर म्हणाले की ,यशाचं रहस्य खूप साधं आहे पण पाळायला कठीण आहे. कोणत्याही स्पर्धेत आपल्याला यश मिळवायचं असेल तर त्यासाठी सातत्य, सराव व स्वतःवर विश्वास असणे गरजेचे आहे.सराव कमी करा पण रोज करा.स्वतःशी स्पर्धा करा आजच्या पेक्षा उद्या मी चांगला खेळेल हा आत्मविश्वास बाळगा.यश त्याचे च असते जो जिद्द,चिकाटी आणि मेहनत घेतो.

जिंकणारा तोच नसतो जो आधी पोहोचतो ,तर तो असतो जो थांबत नाही.ग्राम विकास मंडळ ओतूर व चैतन्य विद्यालय ओतूर यांनी जो आमचा सत्कार केला त्याबद्दल त्यांचे मनापासून धन्यवाद ग्रामविकास मंडळ ओतूरचे सचिव अध्यक्ष मनोगत व्यक्त करतानाम्हणाले की शरद माळवे व अमित झरेकर यांनी सुवर्ण पदकां ची कमाई करून ग्राम विकास मंडळ ओतूर गावाचे नाव राष्ट्रीय स्तरावर पोहोचवले आहे.त्यांच्या या यशामागे त्यांची असलेली मेहनत दिसून येते.

आमचे शिक्षक विद्यार्थ्यांना घडवतातच तसेच स्वतःही स्पर्धेत भाग घेऊन नेत्रदिपक कामगिरी करतात.दोघांनाही ग्राम विकास मंडळ,चैतन्य विद्यालय ओतूर,सरस्वती विद्यालय उदापूर व पुष्पावती विद्यालय डिंगोरच्या सर्व शिक्षकांच्या वतीने पुढील आशियाई स्पर्धेसाठी शुभेच्छा.

या कार्यक्रमाच्या वेळी ग्राम विकास मंडळाचे अध्यक्ष अनिल तांबे,प्रभाकर तांबे ,राजेंद्र डुंबरे,रघुनाथ तांबे,प्रदीप गाढवे,पंकज घोलप,प्रकाश डुंबरे,नितीन तांबे,राजश्री भालेकर,प्रतीक अकोलकर,संजय हिरे, अनिल उकिरडे,भाऊसाहेब खाडे,राजाराम शिंदे , जालिंदर ढमाले,भगवंता घोडे,मंगेश तांबे,संतोष कांबळे,विशाल चौधरी,लक्ष्मण दुडे,बाळासाहेब साबळे,शिल्पा भालेराव,सोनाली माळवे, विजया गडगे ,आशा गाडेकर,वनिता भोर,सोनाली कांबळे,आसावरी गायकर,देवचंद नेहे,दिनेश ताठे, अनिल जवरे,निर्मला डोंगरे,साक्षी देशमुख,रंजीता पाटील,सरस्वती भताने, रसिका शेळके,अश्विनी नलावडे,योगेश फापाळे,तेजस ढमाले,अरविंद आंबरे,दिपक हांडे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष कांबळे यांनी केले आभार विशाल चौधरी यांनी मानले.

# ग्लोबल इंग्लिश स्कूलचा वार्षिक क्रीडा मोहत्सव जल्लोषात संपन्न

**ठाणे, दिवा : (समर्थ गांवकरी)**

दिवा शहरातील ग्लोबल इंग्लिश स्कूलचा वार्षिक क्रीडा दिन दिनांक ३१ जानेवारी व १ फेब्रुवारी रोजी रुणवाल माय सिटी येथील प्रशस्त फुटबॉल मैदानावर अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या दोन दिवसीय क्रीडा महोत्सवात शाळेतील बालवाडीपासून माध्यमिक विभागापर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. क्रीडा दिनामुळे विद्यार्थ्यांच्या अंगी असलेली ऊर्जा, कौशल्ये व क्रीडावृत्ती यांचे प्रभावी दर्शन घडले.




सदर कार्यक्रमाची सुरुवात शिस्तबद्ध व देखण्या मार्च पास्टने झाली. विद्यार्थ्यांच्या ताठ मानेने, एकसमान पावलांनी आणि आत्मविश्वासाने केलेल्या संचलनाने उपस्थितांची मने जिंकली. त्यानंतर घेण्यात आलेल्या प्रेरणादायी मशाल दौडीने क्रीडा दिनाच्या उत्साहात अधिक भर घातली. पुढे विद्यार्थ्यांनी क्रीडा शपथविधी घेऊन प्रामाणिकपणा, शिस्त आणि खिलाडू वृत्ती जपण्याचा संकल्प केला. यानंतर रंगीबेरंगी फुगे आकाशात सोडून क्रीडा दिनाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. या क्षणाने संपूर्ण मैदान आनंद, उत्साह आणि सकारात्मक ऊर्जेने भारावून गेले. या क्रीडा महोत्सवाला दोन दिवस मान्यवर प्रमुख पाहुण्यांची उपस्थिती लाभली.

प्रमुख पाहुणे म्हणून मारुती गायकवाड (मुख्य अधिकारी, कुळगाव–बदलापूर महानगरपालिका) मा. नितीन पगार, पोलीस निरीक्षक, व सहायक पोलीस निरीक्षक अमोल कोळेकर (मुंब्रा पोलीस स्टेशन) यांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली.

मान्यवरांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, शिस्त आणि क्रीडाभावना अधिक दृढ झाली. प्रसंगी शाळेचे व्यवस्थापकीय संचालक महेंद्र दळवी तसेच प्राचार्या ज्योत्स्ना सोनी यांचीही मान्यवर म्हणून उपस्थिती होती. त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना क्रीडा व शिक्षण यांचा समतोल साधण्याचे महत्त्व अधोरेखित केले. क्रीडा दिनाच्या निमित्ताने विविध वयोगटांसाठी धावण्याच्या शर्यती, मैदानी खेळ व इतर क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

या स्पर्धांमधून विद्यार्थ्यांमध्ये तंदुरुस्ती, सहकार्य, संघभावना आणि स्पर्धात्मकतेची सकारात्मक भावना विकसित झाली. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या मार्गदर्शनामुळे सर्व स्पर्धा शिस्तबद्ध व सुरक्षितपणे पार पडल्या.

सदर कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, एकता, आत्मविश्वास, शारीरिक तंदुरुस्ती आणि निरोगी जीवनशैलीचे महत्त्व ठळकपणे अधोरेखित झाले. ग्लोबल इंग्लिश स्कूलने अशा उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी असलेली आपली बांधिलकी पुन्हा एकदा सिद्ध केली.

# बेल्हे येथे भैरवनाथ महाराज यात्रा उत्सव व अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन

**बेल्हे: (समर्थ गांवकरी)**

बेल्हे येथील बाजारतळावर असणा-या अतिशय जागृत व बेल्हे गावचे ग्रामदैवत असणाऱ्या श्रीभैरवनाथ महाराजांच्या यात्रेनिमित्त होणाऱ्या सप्ताह आणि मंदिर कलशारोहण द्वितीय वर्धापन दिन सोहळ्याची सुरुवात मंगळवार दि. ३/२/२०२६ होणार असून दि.१०/२/२०२६ मंगळवारपर्यंत चालणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या कालखंडात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.देव, देश, धर्म व संस्कृती टिकविण्यासाठी सध्याच्या कलियुगामध्ये हरिनामाशिवाय पर्याय नाही. वै.ह.भ.प.कोंडाजीबाबा डेरे यांच्या आशिर्वादाने व ह.भ.प.पांडुरंगमहाराज घुले, ह.भ.प.तुळशिराम महाराज सरकटे यांच्या प्रेरणेने गेली २५ वर्षे अव्याहतपणे हा अखंड हरिनाम




यज्ञ चालू आहे.त्या निमित्ताने पहाटे काकडाभजन, ज्ञानेश्वरी पारायण, गाथाभजन, हरिपाठ व संध्याकाळी हरिकिर्तना नंतर थोर व उदार अन्नदात्यांकडून महाप्रसादाचे आयोजन केले जाते. या सप्ताहकालात ह.भ.प.डॉ. नारायण महाराज जाधव , वैभव महाराज शिंदे, नवनाथ महाराज माशेरे, ज्ञानेश्वर महाराज कदम (मोठे माऊली), ऍड. कृष्णा महाराज चवरे, डॉ. जगदीश महाराज जोशी, सचिन महाराज ढोले, व पांडुरंगमहाराज घुले यांच्या काल्याच्या कीर्तनाने हरीनाम सप्ताहाची सांगता होणार आहे. मंगळवार (दि.१०) रोजी शोभेच्या दारुकामाच्या आतषबाजीत व सनई ताफ्याच्या सुरात भव्य अशी श्रींच्या पालखीची मिरवणूक निघणार असून बुधवार (दि.११) व गुरुवार (दि.१२) रोजी बैलगाड्यांच्या भव्य इनामी शर्यतीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती यात्रा समितीचे जानकू डावखर, प्रदीप पिंगट, सुभाष भुजबळ, स्वप्निल भंडारी यांनी दिली. या हरिनाम सप्ताहास व दोन दिवस चालणाऱ्या यात्रेस परगावी राहणारे चाकरमाणी, व्यवसायिक व उद्योजक उपस्थित राहणार असून आपल्या गावच्या ग्रामदैवताचे दर्शन घेऊन कुटूंबासह कुलाचाराचे विधी करणार आहेत.अखंड हरिनाम सप्ताह व यात्रोत्सव यशस्वी होण्यासाठी समस्त ग्रामस्थ बेल्हे, मुंबईकर, पुणेकर व आजूबाजूच्या सर्व वाड्यावस्त्यावरील मंडळांचे व ग्रामस्थांचे सहकार्य लाभत आहे.

# पोहण्यासाठी गेलेल्या १७ वर्षीय मुलाचा विहिरीत बुडुन मृत्यु



**जामखेड : (समर्थ गांवकरी)**



अहिल्यानगर येथुन जामखेड तालुक्यातील धानोरा या ठिकाणी आपल्या नातेवाईकडे आलेल्या आवेज रिजवान पठाण वय १७ वर्षे या मुलाचा विहिरीतील पाण्यात बडुन मृत्यू झाला. आवेज हा आज सकाळी मित्रांसोबत विहिरीवर पोहण्यासाठी गेला होता या वेळी ही दुर्घटना घडली. या प्रकरणी जामखेड पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की मयत आवेज रिजवान पठाण वय १७ वर्षे रा. बोल्हेगाव, अहिल्यानगर हा काल दि ४ रोजी जामखेड तालुक्यातील धानोरा या ठिकाणी मामेबहीणीच्या मुलाच्या वाढदिवसानिमित्त आला होता. रात्री वाढदिवस झाल्या नंतर आवेद हा त्याचा चुलत भाऊ व मित्र त्या रात्री मुक्कामासाठी धानोरा या ठिकाणी आपल्या नातेवाईकडे थांबले होते. यानंतर दुसऱ्या दिवशी गुरवार दि 5 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी आठ वाजण्याच्या आसपास आवेद हा आपला चुलत भाऊ अन्वर शौकत पठाण व जय संतोष आरु असे तीघेजण धानोरा येथिल घराजवळील विहीरीवर पोहायला गेले होते.

यावेळी मयत आवेज याचा चुलभाऊ व मित्र हे विहिरीमध्ये पोहुन वरती आले होते. यावेळी आवेज हा त्यांना म्हणाला की मला पण पोहता येते असे म्हणुन विहीरीत उडी मारली. मात्र विहीरीत उडी मारल्या नंतर आवेज हा पाण्याच्या वरती आला नाही म्हणून त्याचा चुलत भाऊ व मित्र या दोघांनी मोठ्याने आरडाओरड केला. यावेळी आवाज एकुण वस्तीवरील नातेवाईकांनी विहिरीकडे धाव घेतली. यानंतर पोलीस पाटील योगिनाथ जायभाय यांना फोन द्वारे माहीती दिली, यानंतर पोलीस पाटील यांनी ही घटना जामखेड पोलीस स्टेशन व महसूल विभागास कळवली.

पिंपरखेड येथील रफीक अब्बास सय्यद वय 54 यांनी 23 फुट खोल पाण्यात बुडी घेऊन अवेज याचा मृतदेह पाण्याच्या वरती काढला. सकाळी आठ वाजता बुडालेल्या आवेजचा मृतदेह दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास बाज पाण्यात उलटी टाकुन त्यावर मृतदेह ठेऊन दोरीच्या सहाय्याने मृदतेह पाण्यातुन विहिरीच्या बाहेर म्हणजे तब्बल सहा तासांनी बाहेर काढण्यात आला.

यावेळी मृतदेह काढण्यासाठी त्यांना घटनास्थळी वाजिद पठाण, हरीदास शिरगिरे, माजी सरपंच बालाजी शिंदे, भाऊराव काळे, लाला शिंदे, बाबुराव वाघ, सिकंदर शेख, सलीम शेख यांनी त्यांना मदत केली. यावेळी पोलीस उपनिरीक्षक पुष्कर कडु स. पो. उपनिरीक्षक सलिम शेख, पो. कॉ. जितेंद्र सरोदे, योगेश दळवी, मंडल अधिकारी विजय चव्हाण, पोलीस पाटील योगिनाथ जायभाय, यांनी घटनास्थळी धाव घेत मदत केली. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला. या प्रकरणी निजाम गणी शेख, रा. धानोरा यांनी जामखेड पोलीस स्टेशनला दिलेल्या खबरी वरुन अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.





# नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

दिवा शहरातील श्री संत सेवालाल गोरबंजारा समिती तर्फे ठाणे महापालिकेचे निवडून आलेले दिव्यातील सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार व अभिनंदन करण्यात आले. प्रसंगी शिवसेना शहरप्रमुख व नगरसेवक रमाकांत मढवी, शैलेश मनोहर पाटील, साक्षी रमाकांत मढवी, दिपक जाधव, दर्शना चरणदास म्हात्रे, दिपाली उमेश भगत, अँड. आदेश कमलाकर भगत, स्नेहा अमर पाटिल, अर्चना निलेश पाटिल या नवनिर्वाचित सर्व नगरसेवकांचे पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन अभिनंदन व सत्कार करण्यात आला. संत श्री सेवालाल गोरबंजारा समितीचे अध्यक्ष श्री शंकर पवार, सचिव तारासिंग पवार, मिथुन राठोड, विजय पवार, सुनिल पवार, लक्ष्मण चव्हाण, रमेश राठोड, संतोष पवार, प्रविण राठोड, रामेश्वर पवार, प्रमोद राठोड, श्याम राठोड, चहु चव्हान यांच्यासह कामटीचे सदस्य तसेच समितीचे कार्यकारी सदस्य चंद्रसिहं राठोड, बाबु राठोड, देवीदास राठोड यांनी आपली उपस्थिती दर्शवली.

# ब्राम्हणवाड्यात अवैध दारू विरोधात सलग दोन दिवस छापे, मात्र कारवाई बाबत गूढ कायम!

**दै. स.गांवकरी इम्पॅक्ट**

**ब्राम्हणवाडा : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील अवैध दारू व गुटखा विक्रीविरोधात दैनिक समर्थ गांवकरी यांनी गेल्या तीन दिवसांपासून सातत्याने आवाज उठवत आहे व सातत्याने बातम्यांनी पाठपुरावा करत आहे तसेच संबंधित विभागांकडे तक्रारी सुद्धा दाखल केल्या होत्या. या पार्श्वभूमीवर ब्राम्हणवाडा–बोटा रस्त्यावर सुरू असलेल्या अवैध दारू व्यवसायावर पोलीस प्रशासन (नाशिक विभाग) तसेच एक्साइज विभाग (संगमनेर) यांच्या संयुक्त कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. मात्र या कारवाईत नेमके काय सापडले, किती दारू जप्त झाली आणि कोणावर कोणती कारवाई करण्यात आली, याबाबत अद्याप अधिकृत माहिती देण्यात आलेली नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.



दि. ५ फेब्रुवारी रोजी करण्यात आलेल्या कारवाईत अवैध देशी व विदेशी दारूचा साठा जप्त करण्यात आल्याचे समजते. संबंधित दारू विक्रेत्याच्या समोर पंचनामा करण्यात आला तसेच छायाचित्रेही घेण्यात आली. विशेष म्हणजे याच दिवशी संपूर्ण अकोले तालुक्यात विविध ठिकाणी दारू विक्रेत्यांवर छापेमारी सुरू होती.




या कारवाई दरम्यान दारूबंदी कार्यकर्ते तसेच दैनिक समर्थ गांवकरीचे प्रतिनिधी संजय गायकर घटनास्थळी उपस्थित होते. त्यांनी पोलीस विभाग व एक्साइज विभागाकडे अधिकृत प्रेसनोटची मागणी केली असता, एक्साइज विभागाच्या अधिकाऱ्यांनी "प्रेसनोट देऊ" असे सांगून संपर्क क्रमांक घेतला. मात्र प्रत्यक्षात कोणतीही प्रेसनोट देण्यात आलेली नाही. माहिती देण्यास टाळाटाळ केली जात असल्याचे स्पष्टपणे दिसून आले.

महत्त्वाचे म्हणजे, दि. ४ फेब्रुवारी रोजी याच ब्राम्हणवाडा–बोटा रस्त्यावर आणखी एका दारू विक्रेत्यावर छापा टाकण्यात आला होता. मात्र दैनिक समर्थ गांवकरीचे प्रतिनिधी घटनास्थळी पोहोचेपर्यंत पोलीस ताफा निघून गेला होता. धक्कादायक बाब म्हणजे पोलीस निघून गेल्यानंतर काही वेळातच संबंधित अवैध दारू विक्रेत्याने पुन्हा राजरोसपणे आपला व्यवसाय सुरू केला. यावरून या विक्रेत्यांना कायद्याची भीती उरलेली नाही, हेच स्पष्ट होते.

सतत छापे पडूनही अवैध दारू विक्रेत्यांवर तडीपारची किंवा कठोर स्वरूपाची कारवाई का केली जात नाही, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. नक्की अशी कोणती देवाण-घेवाण होते, ज्यामुळे या विक्रेत्यांना अभय मिळते? कोणाचा आशीर्वाद या अवैध धंद्यांच्या पाठीशी आहे, हा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे.

अकोले तालुक्यात अवैध दारूविरोधात वारंवार आंदोलने होत असताना, प्रत्यक्षात मात्र परिस्थिती 'जखम गुडघ्याला आणि मलम शेंडीला' अशीच असल्याचे चित्र दिसत आहे. एक दिवस आधी छापा पडूनही दुसऱ्याच दिवशी पुन्हा धंदे सुरू होत असतील, तर पोलिसांचा आणि प्रशासनाचा धाक नेमका किती आहे, यावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण होते.

दि. ४ फेब्रुवारी रोजी झालेल्या कारवाईत नेमकी कोणती कारवाई करण्यात आली, किती दारू जप्त झाली, कोणावर गुन्हे दाखल झाले — याबाबत आजतागायत कोणतीही अधिकृत माहिती किंवा प्रेसनोट देण्यात आलेली नाही. ही माहिती जनतेपासून लपवली जात आहे का, अशी शंका आता बळावत आहे.

येत्या काही दिवसांत अकोले तालुक्यात नेमका किती अवैध दारू साठा जप्त झाला आणि किती जणांवर कठोर कारवाई झाली, हे स्पष्ट होईलच. मात्र या कारवाया केवळ दाखवण्यासाठी नसून, अवैध धंदे कायमचे मोडून काढणाऱ्या कठोर आणि परिणामकारक असाव्यात, हीच अपेक्षा सजग नागरिक आणि दैनिक समर्थ गांवकरी व्यक्त करत आहेत.

# होय, माणसातिल देवमाणूस : खा. डॉ. श्रीकांतजी शिंदे

**ठाणे:कल्याण : (समर्थ गांवकरी)**

नेहमीच्या धावपळीत असतानाच मला एक निनावी फोन आला शेवटचा नंबर होता 694... मी म्हटलं आपण कोण बोलतायेत ? पलीकडून आवाज आला,सर मी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतला एक शिक्षक धनराज कुंनगीर सर बोलतोय.मला तुमचा नंबर माझे मित्र दिपक दिनकर सर आणि शिक्षणाधिकारी विजय सरकटे यांनी दिला आणि तो फोनवरच धाय मोकलून रडायलाच लागला. सर माझ्या मुलीला वाचवा हो.ती मरणाच्या दारात उभी आहे आणि ती केवळ चार वर्षाची आहे अहो सर तिचे खेळण्याचं, बागलण्याचं व जगण्याचं असताना ती एकप्रकारे मृत्युशी झुंज देत आहे,लढा देत आहे,तीव्र संघर्ष करीत आहे सर...!



कृपया आपण मला कुठूनतरी काहीतरी वैदेकीय वा आर्थिक मदत मिळवून द्या,आपणच माझे संकटकाळातील खरे संकटमोचक आहात.सर आपण माझं संकट दूर कराल याचा मला ठाम विश्वास वाटतो.मी अत्यंत शांतपणे एकाग्र होऊन त्यांची कैफियत व व्यथा ऐकत होतो. मी म्हटलं...सर मी जरा गावी आलो आहे एक /दोन दिवसांनी आलो की आपण प्रत्यक्ष भेटून बोलूया तुम्हाला स्वतः मी फोन करतो आल्यानंतर मी त्यांना फोन केला सर तुम्ही या मी कल्याणात आलो आहे आपण काय तो मार्ग काढू या मी आणि माझे मित्र श्री. विलास जाधव व अनंत किंनगे आम्ही त्यांना शिवसेना वायले नगर शाखेत बोलावून घेतले.


आई,बाबा आणि त्यांच्या 4 वर्षाच्या आजारग्रस्त चिमुकलीला घेऊन माझ्याकडे आले त्या मुलीच्या डोळ्यात काहीतरी सद्भावना होत्या ती माझ्याकडे एकटक बघत होती परंतु ती अज्ञान असल्याने भविष्यात काय वाढवून ठेवले तिला काहीही ज्ञात नव्हतं तिच्या आजाराबद्दल तिला काहीच माहित नव्हतं आई-वडिलांच्या दोघांच्या डोळ्यात पाणी आलं आणि त्यांच्या अश्रूंना बांध फुटला आणि धाय मोकलून रडायला लागले मी त्यांना शांत केल ते बोलले सर माझी चार वर्षाची मुलगी राघवी आम्हाला तिच्या औषधोपचारासाठी काही 25 हजाराची मदत मिळेल काय ? मी म्हटलं तिला आजार काय आहे तेव्हा त्यांनी सांगितलं की तिला अत्यंत असाध्य थालेसिमिया हा आजार झाला आहे तो मेजर स्वरूपात आहे त्यामुळे तिचं रक्त तयार होत नाही दर पंधरा दिवसांनी रक्त द्यावं लागतं.एक डोनर भेटलेला आहे पण त्याचाच खर्च 12 लाख रुपये आहे. आजाराचं गांभीर्य आणि तीव्रता लक्षात घेता मी म्हटले 25 हजाराच्या तुटपुंज्या मदतीने तुमचं काहीच होणार नाही हॉस्पिटलचा 35 लाख खर्च अफाट आणि अवाढव्य आहे. त्यामधील 15 लाख हॉस्पिटल मदत करणार आहे मग मी विचारलं यापैकी तुम्ही किती रकमेची तरतूद केलेली आहे आपल्याला किती रकमेची गरज आहे.आई-वडील म्हटले सर्व जमापुंजी एकत्र करुन सध्यस्थितीत आमच्याकडे चार ते 5 लाख रुपये आहेत. मग माझं विचारचक्र सुरु झालं. एवढी मोठी मदत उभी करणं गरजेचं आहे. गरज हीच शोधाची जननी असते आणि माझ्यासमोर दुर्मिळातील दुर्मिळ दातृत्वगुण असणारे,मदतीसाठी सदैव तत्पर असणारे,सर्वांसाठी उपलब्ध असणारे,दुसऱ्यांच्या दुःखात धावून जाणारे आणि तमाम महाराष्ट्राचे आरोग्यदूत असणारे आणि 400 ते 500 लहान मुलांच्या हृदयाचे विनामुल्य ऑपरेशन करुन जीवनदान देणारे...अमोघ वकृत्व,अफाट कर्तुत्व,अजोड नेतृत्व,अजेय शूरत्व आणि असीम दातृत्व या पंच गुणांचा सुरेख संगम असलेले पंचमदा म्हणजेच कल्याण लोकसभा मतदार संघांचे लाडके,लोकप्रिय व लोकहितवादी खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे होय....!

डॉ.श्रीकांत शिंदे म्हणजे रुग्णांचे तारणहार,रुग्णांचे मदतगार,रुग्णांना अत्युचं दर्जाची सेवा,मदत व सुविधा उपलब्ध करुन देणारे पृथ्वी तलावरील साक्षात देवदूतच....!

मी क्षणाचाही विलंब न लावता त्या पालकांना म्हटलं आपण खासदार श्रीकांत शिंदे साहेबांकडे जाऊ या साहेबांना आपली सर्व परिस्थिती व व्यथा समजावून सांगू साहेब नक्की त्याच्यातून काहीतरी मार्ग काढतील हा माझा आत्मविश्वास होता कारण एक शिवसैनिक म्हणून व शिवसेनेचा विधानसभा समन्वयक म्हणून साहेबांची काम करण्याची पद्धती, प्रश्न समजून घेण्याची आणि प्रश्न सोडविण्याची क्षमता मी अनेकवेळा अनुभवली आहे. साहेबांनी दिलेला शब्द कधी मोडला नाही आणि लिहिलेला शब्द कधी खोडला नाही.याची जाणीव असल्यामुळेच मी एक -दोन दिवसानंतर कालहरण न करता मी साहेबांचे स्वीय सहाय्यक श्री.अभिजीत दरेकर आणि श्री. प्राजक्त झावरे पाटील यांना फोन केले त्यांनी सांगितलं की साहेब कल्याण पूर्वला येणार आहेत तुम्ही त्या पालकांना घेऊन या मी लगेच पालकांना फोन केला आपल्याला खासदार श्रीकांत शिंदे बोलावलेले आहे सर्व मेडिकल फाईल सोबत घेऊन या

साहेबांचा दरबार म्हटला की कल्याण लोकसभा नव्हे तर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून वेगवेगळ्या समस्यांनी ग्रासलेले,त्रासलेले नागरिक त्या ठिकाणी येऊन आपल्या समस्या व प्रश्न घेऊन येतात आणि सोडवून निघून जातात.येताना नागरिकांच्या चेहऱ्यावर दुःख व चिंता असते परंतु जाताना मात्र प्रत्येकाच्या चेहऱ्यावर एक आनंदाचे हसू व समाधान असतं त्या दिवशी साहेबांचा दरबार होता हजारोंच्या संख्येने नागरिक महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेले होते परंतु हा विषय थोडा सेन्सिटिव्ह असल्याने मी पोचल्यानंतर अभिजीत दरेकरांना फोन केला व विनंती केली त्यांनी लगेच साहेबांची भेट घडवून दिली साहेबांसोबत आई-वडील त्या मुलीची गंभीर आजाराविषयी माहिती देताना आई-वडिलांना रडू कोसळले प्रथमता साहेबांनी त्यांना शांत व्हा.धीर धरा. पाणी घ्या.आपण मार्ग काढू

नंतर साहेबांनी त्या 4 वर्षाच्या चिमुरडीच्या आजारपणा विषयी सखोल माहिती घेतली व मुलीच्या डोक्यावरून मायेचा व प्रेमाचा हात फिरवला. त्यामुळे मुलगी त्यांच्याकडे खूप आशेने बघत होती साहेबांनी क्षणाचाही विचार न करता अभिजीतला सांगितलं की आपल्याला यांना मदत करायची आहे, काय असेल ती सगळी माहिती घे आणि यांना त्वरीत बंगल्यावर बोलावून घे.आम्ही भेट घेऊन घरी निघून आलो. दुसऱ्या दिवशी अभिजीत चा फोन आला आणि सांगितलं भामरे सर पालकांना व मुलीला घेऊन तुम्ही बंगल्यावर या मुलीला आणि आई-वडिलांना घेऊन बंगल्यावर गेलो बंगल्यावर सुद्धा अनेकांची त्या ठिकाणी भेटण्याची गर्दी होती.अभिजीतला कळलं की आम्ही आलो आहोत. अभिजितने क्षणाचाही विलंब न करता आम्हाला बोलवून घेतलं आणि सांगितले की श्रीकांत शिंदे निरोप आहे की या चिमूरडीच्या आजारपणाच्या उपचारासाठी आपल्याला सर्व प्रकारची मदत करायची आहे. सोमवारी तुम्ही



कोकिलाबेन हॉस्पिटल, मुंबई येथे जा.डॉक्टरांना ट्रीटमेंट सुरु करायला सांगा आणि

हॉस्पिटलचा खाते क्रमांक मला पाठवा.आपण संपुर्ण 15/20 लाखाची मदत करु.निश्चिन्त रहा.आम्हाला आणि पालकांना वाटलं होत की मुख्यमंत्री किंवा उपमुख्यमंत्री सहायता निधी मधून दोन-चार लाख रुपये देतील किंवा इतर शासकीय मदत करतील परंतु अभिजीत बोलले की संपुर्ण 15/20 लाख रुपये खर्चाची जबाबदारी खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांनी उचलली आहे.हे वाक्य ऐकून माझ्या आणि पालकांच्या आनंदात पारावार उरला नाही. आई-वडील दोघांच्या आणि माझ्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले... मात्र डोळ्यात आलेले अश्रू हे आनंदाचे,समाधानाचे,जीव्हाळ्याचे,

प्रेमाचे,स्नेहाचे आणि आपुलकीचे होते...!

एक ऋणानुबंध साहेबांनी त्या ठिकाणी जपला.एक सुंदर नातं जुळलं आणि समाधान आणि आनंदाची शिदोरी घेऊन आम्ही खाली उतरलो. आनंदाने सुखावलेल्या चेहऱ्याने

साहेबांना त्या आई-वडिलांनी मनोमनी शुभेच्छा दिल्या

काही माणसं ताडामाडा प्रमाणे उंच वाढवून स्वतःचा अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतात आणि काही माणसं मात्र वटवृक्षाप्रमाणे वाढून दुसऱ्यांना सावली,आधार, प्रेम, जिव्हाळा, आपुलकी,ऋणानुबंध,स्नेह,देण्याचा प्रयत्न करतात ते वटवृक्ष म्हणजेच खासदार श्रीकांत शिंदे

आणि मलाही आत्मसुखाचा, आत्मसमाधानाचा व आत्मानंदाचा सुखद अनुभव घेता आला.आणि माझ्या मुखातून सहज एक शब्द बाहेर पडला तो म्हणजे

"होय,माणसात देव दिसला, देव अनुभवला डॉ.श्रीकांत शिंदे साहेब यांच्या रुपाने.

कल्याण लोकसभेचे खासदार ठिकाणी शिंदे साहेब यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा आई भवानी

# ‘अॅट होम’ रिसेप्शनमध्ये डॉ. दिलीप पुंडे यांना निमंत्रण

**मुखेड : (समर्थ गांवकरी)**



दि. २६ जानेवारी रोजी भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रपती भवनात रिसेप्शन अॅट होम या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. देशातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांना ( Builders of Nation) भारताच्या महामहीम राष्ट्रपती आणि राष्ट्रपती भवनामार्फत विशेष निमंत्रित करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्र सरकारचे अनेक मंत्री, भारताचे चीफ जस्टिस, परदेशी पाहुणे आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर यांची विशेष उपस्थिती होती. माझ्या सर्पदंश कार्याची दखल घेऊन मलाही या कार्यक्रमाचे निमंत्रण प्राप्त झाले आणि माझ्यासाठी हा अत्यंत आनंदाचा आणि भाग्याचा क्षण. महामहिम राष्ट्रपती, पंतप्रधान यांच्याशी भेट आणि वैयक्तिक संवाद साधण्याची संधी मला मिळाली. यासोबतच भारताचे परराष्ट्र मंत्री जयशंकर, आरोग्य मंत्री जेपी नड्डा, अर्थमंत्री निर्मला सीतारामन, पियुष गोयल, अजित डोभाल आदि मान्यवरांसोबत सर्पदंश या विषयावर चर्चा करता आली.

शेतकरी आणि शेतमजुरांच्या व्यथा या महोदयांसमोर मांडण्याचा योग आला. डॉ. दिलीप पुंडे प्रसार माध्यमाशी बोलताना ते म्हणाले की गल्लीपासून सुरू झालेला माझ्या आरोग्यसेवेचा प्रवास राष्ट्रपती भवनापर्यंत आणि जागतिक आरोग्य संघटने पर्यंत पोहोचला.

गोरगरीब शेतकरी, शेतमजूर आणि सर्पदंश रुग्णांच्या वेदनेची संवेदना निश्चितच राष्ट्रपती भवना पर्यंत पोहोचली .

मागील ३८ वर्षांपासूनच्या माझ्या अखंड ,अविरत आणि अथक आरोग्य सेवेचे हे फलित. हा कार्यक्रम पाहून मन भरून आले. मी महामहीम राष्ट्रपती आणि केंद्र सरकारचा विशेष ऋणी आहे. भगवंताचे आशीर्वाद

माझे दिवंगत आईवडील,माझी पत्नी, माझी शासकीय विद्यानिकेतन संभाजीनगर ही शाळा , सर्व गुरुजन, माझी पत्नी ,मुलगा, कन्या पुंडे हॉस्पिटलचे सर्व कर्मचारी आणि सेवेची संधी देणारे हजारो रुग्ण यांच्यामुळे या सोहळ्याचा भागीदार मला होता आले.

हा सोहळा म्हणजे निश्चितच आठवणींचा ठेवा होय. कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी माझ्याकडे शब्द नाहीत. असे डॉ. दिलीप पुंडे यांनी प्रसार माध्यमाशी बोलताना सांगितले.

# कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव योगिराज पवार सेवानिवृत्त



**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव योगिराज पवार हे सेवानिवृत्त झाल्याबद्दल सत्कार करून आला.

बाजार समितीचे सचिव योगीराज पवार हे सेवानिवृत्त झाल्याबद्दल तसेच नवनिर्वाचित सचिव संजय येणुरवार रूजू झाल्यामुळे येणाऱ्यांचे स्वागत व सेवानिवृत्त झाल्याबद्दल निरोप दोघांच्याही सत्कार करण्यात आला.

यावेळी नांदेड कृषी उत्पन्न बाजार समिती नांदेड सचिव माणिक पाटील बारसे,सहसचिव गणेश भारसावडे,लेखापाल बबन शेळके,असलम खान पठाण, संजय कदम, त्र्यंबक भोसीकर कंधार, प्रदिप सुर्यवंशी,परिक्षित मुगंल,रविंद्र राठोड,दिलीप रायफलवार,नागोराव माने, आनंद घोरबांड,चंद्रकांत पाटील, लक्ष्मिकांत येपुरवार, संजय रेड्डी, मंगलवार यांच्या सह सहकार विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# गावातील शाळा आणि मंदिरे गावच्या संस्काराचे केंद्र

## जीवन शास्त्री बाबा कवी यांचे प्रतिपादन

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

जीवनात आनंद आणि सर्वार्थ समाधानी राहण्यासाठी आपले मन देवाला अर्पण करा. गावातील शाळा व मंदिरे गावाच्या संस्काराचे केंद्र असून अध्यात्मिक प्रगतीसाठी आवश्यक आहेत. समाजातील एकोपा साधण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. असे प्रतिपादन जीवन शास्त्री बाबा कवी यांनी केले. तामसा येथील श्री. गोपालकृष्ण मंदिराचा तृतीय वर्धापन दिन व पंचावतार उपहार महोत्सवात केलेल्या प्रवचनात ते बोलत होते. तामसा येथील श्री गोपालकृष्ण मंदिराचा तृतीय वर्धापन दिन व पंचावतार उपहार महोत्सव मंगळवारी मोठ्या थाटात संपन्न झाला. यानिमित्ताने मंदीर परिसरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. सकाळी भगवान गोपाळकृष्ण मूर्तीचे मंगलाभिषेक, महापूजा, ध्वजारोहण, धर्मवार्ता, अर्चनाविधी, पंचावतार उपहार, महाआरती व महाप्रसाद वाटप अशा धार्मिक सोहळा पार पडला. यावेळी धर्मसभेचे अध्यक्ष महंत भागवताचार्य श्री. प्रभाकर बाबा भोकर हे होते. कार्याध्यक्ष म्हणून महंत श्री. संन्याशी बाबा होते. तर प्रमुख प्रवचनकार म्हणून जीवन शास्त्री बाबा कवी होते. धर्मसभेला संबोधित करताना जीवन शास्त्री बाबा कवी म्हणाले, सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींचे विचार शांती, समता व विश्वबंधुत्वाचे असून समाजाला दिशा देणारे, समाजामध्ये एकोपा निर्माण करणारे आहेत. या विचाराचे प्रत्येकाने अनुकरण करावे. मंदिरे अध्यात्मिक प्रगतीसाठी आवश्यक असून समाजातील एकोपा साधण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात असे ते म्हणाले. याप्रसंगी महंत गोपीराज बाबा ईजळीकर, नवगावकर बाबा बरडशेवाळा, प्रभाकर बाबा, महंत महिपाल बाबा पोफाळी, महंत बाबा वारंगा फाटा, महंत गौरव दादा संन्याशी, महंत मोघाळीकर बाबा आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजन महंत भोजराजदादा अमृते यांनी केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महंत प्रभाकरदादा यांनी केले. महंत भोजराज दादा अमृते यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अर्चनाताई अमृते व श्रीकृष्ण मंदिर समितीच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

# आंतरराष्ट्रीय खगोलभौतिकी परिषद

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील गणितीयशास्त्रे संकुलाच्या वतीने “इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन अस्ट्रोफिजिक्स, ग्रॅव्हिटेशन अँड कॉस्मोलॉजी (आयसीएजीसी-२०२६)” या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन दि. १३ व १४ फेब्रुवारी, २०२६ रोजी करण्यात आले आहे. या परिषदेसाठी आतापर्यंत देश-विदेशातील सुमारे २०० प्रतिनिधींनी नोंदणी केली असल्याची माहिती आयोजकांतर्फे देण्यात आली आहे. ही आंतरराष्ट्रीय परिषद विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित होत असून प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांचे विशेष सहकार्य लाभत आहे.

# बरबडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात अॅबुलन्स स्लाईडवर

- बरबडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात एकही कायम डॉक्टर मिळेना
- अनेक रिक्त पद जैसे थे च ? अरोग्य विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष




**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

नायगाव तालुक्यातील बरबडा सर्कल चे गाव आहे बरबडा प्राथमिक आरोग्य केंद्रात सामान्य नागरिकांना अल्पदरात आरोग्याच्या सर्व सोयी सुविधा सहज उपलब्ध व्हाव्यात म्हणून बरबडा येथे प्रधमिक आरोग्य केंद्राची इमारत आहे . पण गोरगरीबांच्या कल्याणासाठी व आपल्या माणसांसाठी म्हणून मंजूर केलेल्या रुग्णालयाची परिस्थिती दिवसेंदिवस अत्यंवसथा होत असून येथे दोन तीन महिन्यांपासून अॅबुलनस नाही व अनेक दिवसांपासून पदें रिक्त आहेत. दाखल होणाऱ्या रुग्णांवर थातूरमातूर उपचार करून नांदेडच्या शासकीय रुग्णालयात पाठविण्याचा सपाटा बरबडा येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी सपाटा लावला आहे. बरबडा अंतर्गत चार उप आरोग्य केंद्र आहेत पण तेथे पर्मनंट डॉक्टर नाही व अनेक पद रिक्त आहे बरबडा प्राथमिक आरोग्य केंद्राला मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या पण डॉक्टर व पदे रिक्त असल्याने अनेक अडचणीना समोर जावे लागत आहे. मागील एक वर्षापासून अनेक गरजू रुग्णांना नांदेड गाठवे लागत आहे मागील काही काळापासून बरबडा आरोग्य केंद्रात अनेक पदे रिक्त असल्याने कमी कर्मचाऱ्यांनर कामाचा बोजा पडत आहे. तर बरबडा येथील व परिसरातील डॉक्टर पर्मनंट वैद्यकीय अधिकारी २) कनिष्ठ सहाय्यक १ ) अधिपरीचारीका २ ) सेवक २ ) आरोग्य सेवीका ) आसे पद रीकत नसल्यामुळे त्याठिकाणी रुग्णांच्या नातेवाइकांना अनेक अडचणीचा सामना करावा लागत आहे. याठिकाणी आता अनुभवी वैद्यकीय अधिकारी असल्याने बरबडा प्राथमिक आरोग्य केंद्रातील बरबडा येथील कर्मचाऱ्यांना मुख्यालयाची अलरजी नांदेड येथून आपडाऊन करत दोन वाजले की रूग्णांचे काही देण्यात घेणे नाही मुख्यालयी राहाण्याचे निर्दशन देण्यात यावेत अशी मागणी नागरिकांनी केली आहे. व रिक्त पदे भरुन डॉ देण्यात यावे अॅबुलनस दूरुसत करून देण्यात यावे अशी मागणी बरबडा परीसरातील नागरिकांनी केली आहे यांनी आमदार राजेश संभाजी पवार व जिल्हाधिकारी , सीईओ , जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी लक्ष देण्यात यावे नायगाव तालुका आरोग्य अधिकारी डॉ.पटवेकर यांना विचारणा केली असता अॅबुलन्स चार पांच दिवसांनी येणारं आहे यांनी असे सांगितले आहे.





# विश्वशांती महायज्ञ पट्टाभिषेक रजत महोत्सव भव्य शोभायात्रेने सुरूवात !

## शोभा यात्रेस अल्प प्रतिसाद ?

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

आनंदनगर केदारे सत्संग भवन पासून शोभा यात्रेने गोपाळचावडी परिसरातील श्री गुरु दशमुखाश्रम, भीमाशंकर नगर येथे आयोजित विश्वशांती महायज्ञ व जगगुरु केदार पीठाधीश्वर यांच्या पट्टाभिषेक रजत महोत्सवास आज दि.५ फेब्रुवारी रोजी भव्य शोभा यात्रेने प्रारंभ झाला असून हा कार्यक्रम ५ फेब्रुवारी ते १२ फेब्रुवारी दरम्यान होणाऱ्या विश्वशांती महायज्ञ पट्टाभिषेक रजत महोत्सवास प्रारंभ मात्र या शोभा यात्रेस महनावा तसा प्रतिसाद दिसून आला नसून अल्प प्रतिसाद असल्याचे दिसून आले आहे. गोपाळचावडी परिसरातील श्री गुरु दशमुखाश्रम, भीमाशंकर नगर येथे दि. ५ ते १२ फेब्रुवारी दरम्यान विश्वशांती महायज्ञ व जगदुरु केदार पीठाधीश्वर यांच्या पट्टाभिषेक रजत महोत्सव आयोतिज करण्यात आला आहे. या महोत्सवात श्री.श्री.श्री. १०८ भीमाशंकरलिंग शिवाचार्य महास्वामीजी यांच्या मार्गदर्शनात होत आहे या महोत्सवास दि. ५ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता केदारेश्वर सत्संग मंडळ, आनंदनगर येथून निघालेल्या भव्य शोभा यात्रेने सुरुवात झाली . यावेळी भाजप खा. अशोकराव चव्हाण, खा. डॉ. अजित गोपछडे, आ. बालाजी कल्याणकर, बोंढारकर, माजी महापौर शैलेजा स्वामी, नगरसेवक किशोर स्वामी, भाजप जिल्हाध्यक्ष संतुक हंबर्डे यांच्यासह अनेकांनी शिवाचार्य महास्वामी महाराजांचे दर्शन घेतले. ही शोभा यात्रा नवा मोंढा, आयटी आय मार्गे वजीराबाद, शिवाजी पुतळा ते गुरुद्वारा चौक आणि येथून जुना मोंढा मार्गे पुढे रवाना झाली भाविक भक्तां सह सजवलेला रथ अश्व, कुंभ-कलश, आरती घेतलेल्या महिला, लेझीम पथक, भजनी मंडळी शोभा यात्रेत सहभागी झाले होते तर अनेक ठिक ठिकाणी भक्तांच्या वतीने पुष्पवृष्टी करण्यात येत होती .

# भोकर येथे विविध स्पर्धांचे आयोजन

**भोकर : (समर्थ गांवकरी)**

त्याग, बलिदान आणि साहसाचे प्रतीक असलेल्या त्यागमूर्ती माता रमाई भिमराव आंबेडकर यांच्या १२८ व्या जयंतीनिमित्त दिनांक ७ फेब्रुवारी २०२६ रोजी, शनिवार सकाळी १० वाजता भोकर शहरातील पंचशील नगर येथील तक्षशिला बुद्ध विहारात विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षमय जीवनाला खंबीर साथ देणाऱ्या माता रमाई आंबेडकर यांच्या त्यागमय जीवनाची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी, त्यांच्यात सर्जनशीलता, स्वतंत्र विचारसरणी, संवाद कौशल्य व आत्मविश्वास वाढावा या उद्देशाने या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभा, पंचशील नगर वार्ड शाखेच्या अध्यक्षा प्रणिता सिद्धार्थ जाधव राहणार आहेत.

# श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय बारड बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ संपन्न

**मुदखेड : (समर्थ गांवकरी)**




स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ बारड संचलित श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय बारडच्या वतीने आज इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभाचा कार्यक्रम संपन्न झाला

कार्यक्रमाची सुरुवात विद्येचे आराध्य दैवत माता सरस्वतीच्या पूजनाने झाली.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी शालेय आठवणींना उजाळा देत, भावपूर्ण मनोगते व्यक्त केली. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा व मार्गदर्शन केले.ज्यावेळी वातावरण भावूक झाले होत. प्रमुख पाहुणे प्रा. नारायण सावंत मार्गदर्शन करताना, 'निरोप घेणे कठीण असले तरी, ही एका नवीन प्रवासाची सुरुवात आहे' असे सांगत परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे मार्गदर्शक प्रा डॉ पंजाब शिंदे यांनी '१२वी च्या बोर्ड परिक्षेला सामोर जातांना' येणाऱ्या अनेक अडचणीचा उलगडा केला .

अध्यक्षीय समारोपात प्रा. परशुराम माने यांनी विद्यार्थांना भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. कैलाश खानसोळे,सूत्रसंचालन गायत्री पवार, तनुजा पवार या विद्यार्थिनींनी केले तर कार्यक्रमाची सांगता प्रा मनोहर ओसावर यांच्या आभार प्रदर्शनाने झाली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व इयत्ता अकरावीचे विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# नगरसेवक उमेश सिंह यांचा तामसा येथे सत्कार



**तामसा : (समर्थ गांवकरी)**

नांदेड वाघाळा महानगर पालिकेचे नवनिर्वाचित नगरसेवक उमेश सिंह चव्हाण यांचे तामसा येथे सत्कार करण्यात आले.

नांदेड महानगरपालिकेचे नवनिर्वाचित प्रभाग ८ मधील नगरसेवक शिवाजीनगर उमेश सिंह चव्हाण हे तामसा येथे आले असता त्यांचा तामसा ग्रामपंचायत कार्यालया तर्फे सत्कार करण्यात आला.

यावेळी सरपंच आंनद घंटळवार, ग्रामविकास अधिकारी शंकर आलेवाड,माजी सरपंच बालाजी महाजन, सदस्य साहेबराव देशमुख,सदस्य आकाश जाधव, सदस्य ज्ञानेश्वर कोडगीरवार,सामाजिक कार्यकर्ते अरविंद कंठाले, युनिस पाशा,प्रतिष्ठित व्यापारी रामसिंह बगेरिया सह मान्यवर उपस्थित होते.

# किनवट स्थानकावर रेल्वे अधिकाऱ्यांना पत्रकार संघाचे निवेदन

## विकासकामे व गाड्यांच्या सुविधांबाबत मागण्या

**किनवट : (समर्थ गांवकरी)**



किनवट रेल्वे स्थानकावर दक्षिण मध्य रेल्वेचे जनरल मॅनेजर, नांदेड विभागीय व्यवस्थापक तसेच विविध वरिष्ठ अधिकारी यांच्या दौऱ्यादरम्यान किनवट पत्रकार संघाच्या पत्रकारांनी प्रवाशांच्या सोयीसाठी विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. किनवट हे दक्षिण मध्य रेल्वे मार्गावरील अत्यंत महत्त्वाचे तसेच रेल्वेला चांगले उत्पन्न देणारे स्थानक म्हणून ओळखले जाते. सध्या केंद्र शासनाच्या ‘अमृत भारत’ योजनेअंतर्गत स्थानकावर विविध विकासकामे सुरू आहेत. स्थानकाच्या विकासामुळे प्रवाशांना भविष्यात अधिक सुविधा उपलब्ध होण्याची अपेक्षा व्यक्त होत असतानाच, विद्यमान रेल्वे सेवा व गाड्यांच्या वेळांबाबत मात्र प्रवाशांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे पत्रकार संघाने निवेदनात नमूद केले आहे.

पत्रकार संघाने दिलेल्या निवेदनामध्ये ट्रेन क्रमांक ५७६५४ या गाडीची किनवट येथून सुटण्याची वेळ सकाळी ५ ते ६ वाजण्याच्या दरम्यान करण्यात यावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. तसेच ट्रेन क्रमांक ७७६१६ (आदिलाबाद – पुर्णा) व ट्रेन क्रमांक ७७६१५ (पुर्णा – आदिलाबाद) या गाड्यांमधील विद्यमान बोगी काढून त्या ऐवजी सवारी गाडीच्या बोगी जोडण्यात याव्यात, अशी मागणीही करण्यात आली.

यासोबतच पुणे – नांदेड अथवा हडपसर – नांदेड या गाडीचा विस्तार करून ती आदिलाबादपर्यंत चालविण्यात यावी, तसेच आदिलाबाद येथील पिट लाईनचे काम लवकर पूर्ण करून नांदेड येथे मुक्कामी असलेल्या गाड्या आदिलाबादपर्यंत विस्तारीत कराव्यात, अशी मागणीही पत्रकार संघाने निवेदनाद्वारे केली.

दरम्यान, किनवट स्थानकाच्या पाहणीसाठी आलेल्या दक्षिण मध्य रेल्वेच्या जनरल मॅनेजर यांनी केवळ १५ मिनिटांतच आपला दौरा आटोपल्याने स्थानिक प्रवासी व नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत असल्याचेही समोर आले आहे. किनवटसारख्या महत्त्वाच्या स्थानकावरील समस्या व प्रवाशांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी अधिक वेळ देणे आवश्यक होते, अशी प्रतिक्रिया स्थानिक स्तरावर व्यक्त केली जात आहे.

सदर निवेदनावर पत्रकार जिल्हा उपाध्यक्ष प्रदिप वाकोडीकर, माजी नगराध्यक्ष के. मुर्ती, फुलाजी गरड, गोकुळ भवरे, किरण किनवटकर, दुर्गादास राठोड, तालुका सचिव बालाजी सिरसाठ तसेच अॅड. कचरु जोशी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. किनवट परिसरातील प्रवाशांच्या सोयीसाठी रेल्वे प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेत लवकरात लवकर मागण्या मान्य कराव्यात, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# 'AM/NS इंडिया' पहिली इंटिग्रेटेड स्टील प्रोड्यूसर

**दिल्ली/मुंबई : (समर्थ गांवकरी)**

आर्सेलॉरमित्तल निप्पॉन स्टील इंडिया (AM/NS इंडिया) झाली आहे नवीन ग्रीन स्टील टॅक्सॉनॉमीमध्ये 'मिनिस्ट्री ऑफ स्टील्स' कडून नवीन 'ग्रीन स्टील सर्टिफिकेशन' मिळालेले देशातील पहिले इंटिग्रेटेड स्टील प्रोड्यूसर. 'AM/NS इंडिया' च्या 'हॉट रोल्ड' (HR) कॉइल्स आणि शीट्सना फोर-स्टार रेटिंग मिळाले आहे आणि 'कोल्ड रोल्ड' (CR) कॉइल्स आणि शीट्सना थ्री-स्टार रेटिंग मिळाले आहे.

ऑटोमोटिव,इन्फ्रास्ट्रक्चर, डिफेन्स, कन्स्ट्रक्शन इक्विपमेंट आणि कन्झ्युमर ड्यूरेबल्स सेक्टर्ससाठी महत्वाची इन्पुट्स असलेली ही प्रॉडक्ट्स - आता सरकार प्रमाणित ग्रीन स्टीलसाठी अधिकृतपणे मान्यताप्राप्त आहेत, जी कस्टमर्सना त्यांच्या व्हॅल्यू चेन्समध्ये (or मूल्य शृंखलेमध्ये) स्कोप 3 एमिशन्स कमी करणे शक्य करतात

प्रमाणीकरणासाठीची पात्रता फिनिश्ड स्टीलच्या ($tCO_2e$/tfs) प्रति टन समतुल्य $CO_2$च्या 2.2 टन्सपेक्षा कमी पात्र गणल्या गेलेल्या थ्रेशोल्डसह (or आरंभासह) स्टील प्रॉडक्शनच्या (or उत्पादनाच्या) एमिशन्स इंटेन्सिटीवर (or उत्सर्जन तीव्रतेवर) आधारलेली आहे. ह्या थ्रेशोल्डपेक्षा (or आरंभापेक्षा) कमी एमिशन्ससह (or उत्सर्जनासह) तयार करण्यात आलेले स्टील थ्री-टियर सिस्टिम अंतर्गत: थ्री-स्टार, फोर-स्टार किंवा फाइव-स्टार ग्रीन स्टीलम्हणून रेट केले जाते.

प्रमाणीकरण मिळवण्यासाठी, AM/NS इंडियाला 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सेकंडरी स्टील टेक्नॉलॉजी' (NISST) द्वारा कठोर (or काटेकोर/कडक) तपासणीला सामोरे जावे लागले, ज्यातून कंपनीचा फ्लॅगशिप (or प्रमुख) फ्लॅट स्टील पोर्टफोलिओ ग्रीन स्टील निकषांची पूर्तता करत असल्याला पुष्टी मिळाली.

श्री. दिलिप ऊम्मेन, सीईओ, आर्सेलोमित्तल निप्पॉन स्टील इंडिया (AM/NS इंडिया), म्हणाले : " भारताच्या ग्रीन स्टील टॅक्सॉनॉमीने स्टील इंडस्ट्री आणि तिचे डीकार्बनायझेशन ह्यांच्या भावी वाटचालीसाठी सुस्पष्ट मार्ग दाखवला आहे. AM/NS इंडिया तिच्या कार्बन पाऊलखुणा कमी करण्यासाठी मोजण्यायोग्य प्रयत्नांसह लो कार्बन स्टीलचे उत्पादन करीत आहे आणि तिची नवीन रचना ह्या बांधीलकीला आणखी पाठबळ देणारी आहे. हे प्रमाणीकरण 'लो कार्बन' प्रोसेसेस आणि क्लीन एनर्जी ह्यावर लक्ष केंद्रित करणाऱ्या गुंतवणुकींच्या आधाराने ह्या वाटचालीतील आपली प्रगती प्रतिबिंबित करते. ही मान्यता 'स्मार्टर स्टील्स, ब्राइटर फ्यूचर' हे आपले ब्रँड प्रॉमिस प्रत्यक्षात देऊ करण्यावर आपण लक्ष केंद्रित करत असल्याचे दर्शवते. हा विकास स्टीलमेकर्स राष्ट्रीय हवामान उद्दिष्टांना पाठबळ देण्यामध्ये महत्वाची भूमिका देखील अधिक दृढ करीत आहे, तसेच जागतिकदृष्ट्या स्पर्धाक्षमआहे".

'AM/NS इंडिया' ची तिच्या फ्लॅट स्टील्ससाठी 'ग्रीन स्टील' सर्टिफिकेशन (or प्रमाणिकरण) सुरक्षित करण्याची क्षमता तिची संरचनात्मक 'लोअर-कार्बन' उत्पादन रूपरेखा प्रतिबिंबित करते.

सर्टिफिकेशन (or प्रमाणीकरण) सुरक्षित करून, AM/NS इंडियाने फोर-स्टार रेटेड HR प्रॉडक्ट्स आणि थ्री-स्टार रेटेड CR प्रॉडक्ट्सच्या कमर्शियल प्रॉडक्शनला सुरुवात केली आहे, जे स्थानिक कस्टमर्सना विश्वसनीय, सरकारद्वारा पडताळलेला ग्रीन स्टील पर्याय उपलब्ध करून देते आणि एक स्पर्धाक्षम आणि शाश्वत स्टील प्रोड्यूसर (or उत्पादक) म्हणून जागतिक पातळीवर भारताचे स्थान बळकट (or मजबूत) बनवते. FY25 मध्ये, AM/NS इंडियाने राष्ट्रीय सरासरीच्या तुलनेमध्ये 14% कमी $CO_2$ एमिशन्स इंटेन्सिटी (or उत्सर्जन तीव्रता) संपादित केली आहे. 2021 ह्या बेसलाइनच्या समक्ष गणना करून 2030 पर्यंत एमिशन्स इंटेन्सिटी (or उत्सर्जन तीव्रता) 20% कमी करायचे कंपनीचे लक्ष्य आहे.

# हिंदसेवाच्या विद्यार्थ्यांनी घेतला हुरडा,हरभरा, कणसं यांचा मनमुराद आस्वाद

- हिंद सेवाच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी घेतला शेकोटीचा आनंद
- लक्ष्मीनारायण सत्संग मंडळाचा देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम रंगला



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

हिंद सेवा मंडळाच्या प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांसाठी लक्ष्मीनारायण सत्संग मंडळाच्या वतीने भक्ती गीतांसोबतच देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. देवा हो देवा गणपती देवा तुमसे बढकर कौन,सत्यम शिवम सुंदरम,ए मेरे प्यारे वतन तुझं पे दिलं कुर्बान,प्रित जहाँ की रीत सदा मैं गीत वहा के गाता हुं भारत का रहनेवाला हुं भारत के गीत गाता हु,जहा डाल डाल पर सोनेकी चिडीया करती है बसेरा वो भारत देश है मेरा,कर चले हम फिदा जान और तन साथीयो अब तुम्हारे हवाले वतन साथीयो,देदी तुने आजादी बिना खडग बिना ढाल साबरमती के संत तुने कर दिया कमाल.ही देशभक्तीपर गीते सादर करण्यात आली. यानंतर शेकोटी चे पूजन हिंद सेवा मंडळाच्या प्राथमिक शाळेचे चेअरमन मधुसूदन सारडा व सौ.स्मिता सारडा यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी दादा चौधरी विद्यालयाचे चेअरमन अनंत देसाई,लक्ष्मीनारायण सत्संग मंडळाचे अविनाश बिहानी, राजेश झंवर, ओमप्रकाश मुंदडा,दिपक काबरा,लक्ष्मी निवास सारडा, संजय सारडा, सचिन क्षिरसागर, दिलीप चंगेडिया,अनिल झंवर, शैला सारडा, विनिता सारडा, सौ.चंगेडिया, शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे आदींसह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेकोटी पेटल्यानंतर विद्यार्थ्यांनी सुरती हुरडा व मक्याची कणसे व ओला हरभरा यांचा मनमुराद आस्वाद घेतला. दरवर्षी विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम घेण्यात येतात.विद्यार्थ्यांना ग्रामीण भागातील शेकोटीचा आनंद मिळावा.यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.असे मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे यांनी सांगितले आहे.

# कोरोना योद्ध्यांचा आक्रोश : सेवेत सामावून घेण्याच्या मागणीसाठी आमरण उपोषणाचा इशारा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



कोरोना काळात जीव धोक्यात घालून अहिल्यानगर महानगरपालिकेत अत्यावश्यक सेवा बजावलेल्या कोरोना योद्ध्यांना अद्याप सेवेत सामावून घेतले जात नसल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. याबाबत वारंवार अर्ज करून तसेच पंतप्रधान कार्यालयाच्या (PMOPG) तक्रार निवारण पोर्टलवर तक्रार नोंदवूनही महानगरपालिका गांभीर्याने दखल घेत नसल्याचा आरोप कोरोना योद्धे सनी भीमराव माघाडे यांनी केला आहे. सनी माघाडे यांनी सांगितले की, कोरोना महामारीच्या काळात त्यांनी सुमारे सात महिने अहिल्यानगर महानगरपालिकेत अत्यावश्यक सेवेत काम केले. त्या काळात स्वतःच्या जीवाची पर्वा न करता सेवा दिली. मात्र कोरोना प्रादुर्भावानंतर नियुक्त्या कमी करण्यात आल्या आणि आज त्यांच्या समोर उपासमारीची वेळ आली आहे. दरम्यान, राज्य शासनाने राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) अंतर्गत दहा वर्षांची सेवा पूर्ण केलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, कोरोना काळात प्रत्यक्ष मैदानात काम केलेल्या कोरोना योद्ध्यांसाठी ही अट शिथिल करून थेट सेवेत सामावून घ्यावे, अशी मागणी करण्यात येत आहे. यासंदर्भात यापूर्वीही निवेदन देण्यात आले होते, मात्र त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात येतो. या संदर्भात पंतप्रधान कार्यालयाकडून अहिल्यानगर महानगरपालिकेला तक्रारीची दखल घेण्याचे निर्देश देण्यात आले असतानाही कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही, असेही माघाडे यांनी नमूद केले. जर येत्या दोन दिवसांत महानगरपालिकेकडून सेवेत सामावून घेण्याची आदेशपत्रे (ऑर्डर) काढली गेली नाहीत, तर दिनांक ९ फेब्रुवारीपासून अहिल्यानगर महानगरपालिकेसमोर बेमुदत आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. या उपोषणासंदर्भात उद्भवणाऱ्या कोणत्याही परिस्थितीस अहिल्यानगर महानगरपालिका व जिल्हा प्रशासन जबाबदार राहील, असेही कोरोना योद्ध्यांनी स्पष्ट केले आहे.

# 'सत्य साईबाबांच्या चरणी सांगा'

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

नगर–मनमाड महामार्गाच्या रखडलेल्या कामावरून खासदार निलेश लंके यांनी सत्ताधाऱ्यांवर तीव्र टीका केली आहे. मागील सात–आठ वर्षांपासून हा महामार्ग अपूर्ण असून, या कालावधीत अनेक ठेकेदारांनी काम अर्धवट सोडून दिले. मात्र, यामागील नेमकी कारणे अद्याप समोर आलेली नाहीत, असा आरोप त्यांनी केला. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना लंके म्हणाले की, महामार्गाचे काम अर्धवट सोडून ठेकेदार का गेले, कुणाला वैतागून गेले, कुणी काय मागणी केली, याची स्पष्ट माहिती समाजासमोर यावी. शिर्डीच्या साईबाबांच्या चरणी हात ठेवून सांगा, पैसे कुणी मागितले, असे आव्हान त्यांनी सत्ताधाऱ्यांना दिले.

# कोटक फ्लेक्सिकॅप फंडची दीर्घकालीन संपत्ती निर्मितीच्या प्रवासाची १५ वर्षे पूर्ण

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

कोटक महिंद्रा ॲसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेड ("केएमएएमसी" / "कोटक म्युच्युअल फंड") च्या 'कोटक फ्लेक्सिकॅप फंड' योजनेने आपल्या वाटचालीच्या १५ वर्षांचा टप्पा अतिशय यशस्वीरित्या पूर्ण केला आहे. या फंड योजनेने तिच्या शुभारंभापासून आतापर्यंत गुंतवणूकदारांना सरासरी १६.५९ टक्के दराने वार्षिक चक्रवाढ परतावा प्रदान केला आहे. बाजारातील विविध चढ-उतारांच्या काळातही या फंडाने या दीर्घकाळात अतिशय दमदार कामगिरीची नोंद केली आहे.

कोटक महिंद्रा ॲसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक नीलेश शाह म्हणाले, "कोटक फ्लेक्सिकॅप फंडने १५ वर्षे पूर्ण करणे हा आमच्यासाठी त्याचबरोबर या फंडाशी एकनिष्ठ राहिलेल्या गुंतवणूकदारांसाठी अतिशय अभिमानाचा क्षण आहे. फ्लेक्सिकॅप हा गुंतवणूक प्रकार अतिशय महत्त्वाचा ठरला आहे, कारण तो गुंतवणूकदारांना भारताच्या विविध क्षेत्रातील आर्थिक प्रगतीत सहभागी होण्यास संधी देतो. त्याचबरोबर विविध भांडवली मूल्याच्या कंपन्यांमध्ये किती पैसे गुंतवायचे, याचा निर्णय घेण्याची जबाबदारी एका अनुभवी गुंतवणूक टीमवर सोपवण्याची सुविधाही पदान करत." ३१ डिसेंबर २०२५ पर्यंतच्या आकडेवारीनुसार, 'कोटक फ्लेक्सिकॅप फंडच्या 'डायरेक्ट प्लॅन - ग्रोथ ऑप्शन' ने गेल्या १० वर्षांत सरासरी १५.७० टक्के दराने वार्षिक चक्रवाढ आणि गेल्या ५ वर्षांत सरासरी १६.८७ टक्के दराने वार्षिक चक्रवाढ परतावा दिलेला आहे.

फ्लेक्सिकॅप फंड हा लार्ज-कॅप, मिड-कॅप आणि स्मॉल-कॅप अशा सर्व प्रकारच्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक करत असल्यामुळे बदलत्या बाजार परिस्थितीनुसार तो लवचिक राहू शकतो. डिसेंबर २०२५ पर्यंतच्या आकडेवारीनुसार, कोटक फ्लेक्सिकॅप फंडाने सुमारे ७३ टक्के गुंतवणूक मोठ्या कंपन्यांमध्ये, १९ टक्के मध्यम कंपन्यांमध्ये आणि ५ टक्के लहान कंपन्यांमध्ये केली आहे. या फंडाचा पोर्टफोलिओ साकारताना 'टॉप-डाउन' पध्दतीने क्षेत्राचा अभ्यास आणि 'बॉटम-अप' पध्दतीने विशिष्ट समभागाची निवड अशा दोन्ही पद्धतींचा वापर केला जातो. या फंडाची मुख्य गुंतवणूक वित्तीय सेवा, ऑटोमोबाईल आणि त्याचे सुटे भाग, कॅपिटल गुड्स, रसायने, बांधकाम साहित्य आणि ग्राहक सेवा या क्षेत्रांतील कंपन्यामध्ये आहे. जिथे समभागाची किंमत रास्त आहे आणि भविष्यातील नफ्याची स्पष्टता दिसत आहे, अशा दीर्घकालीन संधी शोधण्यासाठी संशोधनावर आधारलेला दृष्टिकोन या फंडाला गुंतवणूकीसाठी मदत करतो.

या फंडाचे व्यवस्थापन कोटक महिंद्रा एएमसीच्या सीआयओ हर्षा उपाध्याय करत आहेत आणि त्यांची गुंतवणूकीची विचारसरणी कंपनीचे शाश्वत उत्पन्न, सक्षम प्रशासन आणि भांडवली कार्यक्षमता या तत्वांवर आधारलेली आहे. या फंडाच्या कामगिरीबद्दल बोलताना हर्षा उपाध्याय म्हणाल्या, "आम्ही सातत्याने शाश्वत कमाईची क्षमता आणि उत्कृष्ट भांडवल कार्यक्षमता असलेल्या कंपन्यांना प्राधान्य दिल्यामुळे कोटक फ्लेक्सिकॅप फंडाने गेल्या १५ वर्षांत शेअरबाजारातील विविध चढ-उतारांदरम्यान अतिशय यशस्वीरित्या मार्गक्रमण केले.

# पूर्वीचे सरकार स्थगिती सरकार, आमचे सरकार प्रगती सरकार आहे : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**राजगुरुनगर : (समर्थ गांवकरी)**




भावाची ओवाळणी ,लाडक्या बहिणींना दर महिना मिळणार बंद होणार नाही असा पुनउच्चार महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राजगुरुनगर येथे केले. जिल्हा परिषद व पंचायत समिती च्या प्रचारार्थ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची येथील खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पटांगणात सभा झाली .त्यावेळी उपस्थित सभेला संबोधित करत होते.यावेळी जुन्नरचे आमदार शरद सोनवणे,शिवसेनेचे उपनेते इरफान सय्यद,माजी जिल्हा परिषद सदस्य अतुल देशमुख,जिल्हाध्यक्ष भगवान पोखरकर,तालुका अध्यक्ष प्रकाश वाडेकर,चाकणच्या नगराध्यक्षा मनिषाताई गोरे, राजगुरुनगर चे नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ,उपनगराध्यक्ष मनोहर सांडभोर,नितीन गोरे,राम रेपाळे,विशाल रेपाळे,धनंजय पठारे,नगरसेवक राहुल आढारी, गणेश थिगळे,राहुल पिंगळे,आणि शिवसेनेचे पदाधिकारी,जिल्हा परिषद पंचायत समिती चे सर्व उमेदवार यावेळी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुढे म्हणाले की आमच्या सरकारने विविध लोकाभिमुख योजना आणल्या,विकासाला चालना दिली. महाराष्ट्राला पुढे नेण्याचे काम केले. पूर्वीचे सरकार स्थगिती सरकार होते,आमचे सरकार प्रगती सरकार आहे.शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही तर योग्य वेळी शेतकऱ्यांची कर्जे माफ करणार,शेतकरी आमच्यासाठी केंद्रबिंदू आहे.चाकण , राजगुरुनगर नगरपरिषदेत तुम्ही भगवा फडकाविला,क्रांतिकारकांच्या भूमीत विकासाची क्रांती घडवायची आहे.त्यासाठी जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीत साथ द्या ,आमदार शरद सोनवणे म्हणाले नगरपरिषद निवडणुकीत उत्तर पुणे जिल्ह्यात चमत्कार केला येत्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीत साहेबाना विश्वास द्या,निवडणुकीदरम्यान कितीही पैसे खर्च केले तरी पैसा सर्वस्व नाही,जबाबदारी,विचारधारा पाहिजे,जो काम करेगा वो राजा होगा.या सभे दरम्यान खेड तालुक्यातील जिल्हापरिषद गट,व पंचायत समिती गणातील सर्व उमेदवार कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# १२ महिन्यांत ९५% आरसी ट्रान्सफर

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

संपूर्ण भारतात रस्ते सुरक्षा आणि कायदेशीर जबाबदारीवर लक्ष वाढत असल्यामुळे, वाहनांच्या मालकीसंबंधी कागदपत्रे हे यूज्ड-कारच्या खरेदी-विक्रीमध्ये महत्त्वाचे झाले आहेत. ग्राहक आता पारंपारिक अनौपचारिक रिसेल माध्यम आणि स्थानिक डीलर्सपासून दूर जात आहेत आणि त्याऐवजी अशा प्लॅटफॉर्मवर विश्वास ठेवत आहेत जे पारदर्शकता, सत्यापित कागदपत्रे आणि विश्वासार्ह परिणाम देतात. Spinny कडून आलेल्या नव्या आकडेवारीत हा बदल स्पष्ट दिसून येतो. या फुल-स्टॅक वापरलेल्या कार्सच्या प्लॅटफॉर्मने गेल्या 12 महिन्यांत 95% RC ट्रान्सफर पूर्ण करण्याचा दर साधला आहे, ज्यामुळे वाहन हँडओव्हर नंतर विक्रेत्यांमधील अनिश्चितता कमी झाली आहे.

# ल्युकेमिया असलेल्या मुलाचे जीवन वाचवण्यासाठी आईने स्टेम सेल्स केले दान

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

मुंबईतील नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन हॉस्पिटलने १२ वर्षीय प्रदीप कुमार (नाव बदलले आहे) वर यशस्वी उपचार केले आहेत, जो दुर्मिळ आणि अत्यंत आक्रमक प्रोग्रेसिव्ह ल्युकेमियाशी झुंजत होता. या उपचारात प्रगत आणि क्वचितच केले जाणारे टी-डिप्लेटेड हॅप्लोइडेंटिकल स्टेम सेल प्रत्यारोपण समाविष्ट होते, मुलाची आई अर्ध-मॅच्ड दाता म्हणून पुढे आली आणि तिच्या मुलाला जीवनाची एक नवीन संधी मिळाली.

बाळाला जवळजवळ तीन वर्षांपूर्वी सीएमएल (क्रॉनिक मायलोइड ल्युकेमिया) असल्याचे निदान झाले होते आणि तो लक्ष्यित थेरपीवर होता. तथापि, कालांतराने त्याची प्रकृती बिघडली आणि हा आजार एएमएल (ॲक्यूट मायलोइड ल्युकेमिया) च्या ब्लास्ट क्रायसिस टप्प्यात गेला. हा ल्युकेमियाचा एक जीवघेणा प्रकार आहे ज्यासाठी त्वरित उपचार आणि हस्तक्षेप आवश्यक आहे. केमोथेरपीनंतर आणि कमीतकमी अवशिष्ट रोग नकारात्मकता प्राप्त केल्यानंतर, मुलाला बोन मॅरो ट्रान्सप्लांट (बीएमटी) साठी नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन हॉस्पिटल, मुंबई येथे रेफर करण्यात आले.

जुळणारा भाऊ किंवा बहीण दाता उपलब्ध नसल्याने, वैद्यकीय पथकाने त्याच्या आईचे संभाव्य दाता म्हणून मूल्यांकन केले. विशिष्ट KIR मिसमॅच विश्लेषणासह तपशीलवार सुसंगतता चाचणी केल्यानंतर, पथकाने हॅप्लोइडेंटिकल (अर्ध-जुळणारे) प्रत्यारोपण करण्याचा निर्णय घेतला आणि आईची दाता म्हणून निवड करण्यात आली. मुलाने टी-डिप्लेटेड हॅप्लोइडेंटिकल हेमॅटोपोएटिक स्टेम सेल प्रत्यारोपण (HSCT) केले, ही एक तांत्रिकदृष्ट्या गुंतागुंतीची आणि संसाधन-केंद्रित प्रक्रिया आहे ज्यासाठी उच्च पातळीची कौशल्ये आणि प्रगत पायाभूत सुविधा आवश्यक आहेत. मुलाने प्रत्यारोपण चांगले सहन केले आणि 42 दिवस BMT युनिटमध्ये राहिला. उल्लेखनीय म्हणजे, त्याला कोणतीही मोठी गुंतागुंत जाणवली नाही, प्रत्यारोपण यशस्वीरित्या उत्खनन झाले आणि 100 टक्के डोनर काइमेरिझम साध्य झाला.

आज, प्रत्यारोपणाच्या 18 महिन्यांनंतर, प्रदीप पूर्णपणे बरा झाला आहे. त्याला ग्राफ्ट-व्हर्सस-होस्ट रोग (GVHD) झालेला नाही किंवा सुप्त विषाणूचे पुनरुज्जीवन झालेले दिसून आले नाही. तो पूर्णपणे निरोगी आणि सक्रिय जीवन जगत आहे. तो सध्या टायरोसिन काइनेज इनहिबिटर औषध घेत आहे, जे त्याला पुढील सहा महिने घ्यावे लागेल, त्यानंतर तो सर्व औषधे बंद करेल.

# मुरबाडची धानिवलीतील मृगाक्षी राणे जाणार इस्त्रोला

## जिल्हा परिषदेच्या मिशन भरारी परीक्षेत जिल्ह्यातून प्रथम

**मुरबाड :ठाणे : (समर्थ गांवकरी)**




जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांची संकल्पना असलेला मिशन भरारी हा उपक्रम हाती घेण्यात आला होता. या उपक्रमांतर्गत इ.5 वी ते 8वी च्या विद्यार्थ्यांची केंद्रस्तर, तालुकास्तर व जिल्हास्तर अशी परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेत यशस्वी गुणांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना जिल्हा परीषद ठाणेमार्फत इस्रो येथे सहलीत सहभाग व सन्मानपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे.

या परीक्षेत मुरबाड तालुक्यातील जि.प.शाळा म्हसा येथील सहावीतील विद्यार्थीनी शिक्षक कन्या मृगाक्षी राणे हिने 95 टक्के गुण मिळवून जिल्ह्यातून प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. मृगाक्षीचे आई वडील नितीन राणे आणि अर्चना राणे हे दोघे जि.प.शाळा बोरीवली येथे शिक्षक आहेत. आपल्या मुलीला जिल्हा परीषदेच्याच शाळेत शिक्षण देऊन त्यांनी समाजासमोर एक वेगळा आदर्श समजा पुढे दाखवला आहे.

# पुण्यामध्ये मानसिक आरोग्य सेवेला मागणी : स्थानिक नमुने समोर

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



पुण्यातील मानसिक आरोग्याच्या समस्यांमध्ये एकट्यादुकट्या किंवा छोट्या घटनांपेक्षा सततचा ताण, चिंता आणि भावनिक त्रास यांचे प्रतिबिंब पडले आहे. आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या संस्थापक आणि अध्यक्षा श्रीमती नीरजा बिर्ला यांच्या नेतृत्वाखालील एम्पॉवर या उपक्रमाच्या अंतर्गत मानसिक आरोग्य ट्रेंड्समध्ये ही माहिती समोर आली आहे. एम्पॉवरने केलेल्या एका विशेष शहरकेंद्रित मानसिक आरोग्य अभ्यासातून दिसून आले आहे, की पुण्यातील पाचपैकी चार रहिवासी कोणत्या ना कोणत्या मानसिक आरोग्य समस्यांनी ग्रस्त आहेत. यामध्ये - विशेषतः तरुण आणि किशोरांमध्ये - प्रचलित चिंता, घाबरण्याची लक्षणे आणि नैराश्य यांचा समावेश आहे. स्थानिक हेल्पलाइनच्या डेटानुसार, पुण्यामध्ये नातेसंबंधातील आव्हाने (३२ टक्के) आणि चिंता (२६ टक्के) या मुद्द्यांचा क्रमांक सर्वांत वर लागतो. बहुतांशी वेळेस शहरातील वेगवान जीवनशैली, तीव्र शैक्षणिक वातावरण आणि व्यावसायिक स्पर्धा यांच्याशी त्यांचा संबंध असतो. स्थानिक मानसिक आरोग्य तज्ञांच्या मते हे भावनिक त्रास वाढवणारे घटक आहेत. "पुण्यातील मानसिक आरोग्याची आव्हाने ही एकटीदुकटी नाहीत," असे द एम्पॉवर सेंटरच्या पुणे येथील मानसोपचारतज्ज्ञ डॉ. स्नेहा आर्य म्हणाल्या. "नातेसंबंधांमधील ताणापासून ते काम आणि शैक्षणिक ताणापर्यंत, सार्वत्रिक शहरी दबाव आणि पुण्यातील अनोखी सामुदायिक गतिशीलता यांचे प्रतिबंब या प्रवाहांमध्ये पडले आहे." एम्पॉवरच्या कार्यक्रमाच्या आकडेवारीवरून असे दिसून येते की सर्व वयोगटांतील लोकांना मदत हवी आहे. पश्चिम विभागात (पुणे आणि मुंबईसह), जवळजवळ ३९ लाख लाभार्थींपर्यंत (३,८८८,३१२) मदत पोहोचली, यामध्ये १८-२५ वर्षे वयोगटातील आणि २६-४९ वयोगटातील प्रौढांचा अर्थपूर्ण सहभाग होता आणि किशोरवयीन मुले (०-१७) हा एकंदरीत सर्वात मोठा वयोगट होता. शाळा, विद्यापीठे आणि कामाच्या ठिकाणी प्रतिबंधात्मक सहभागी स्वरूपांची आवश्यकता त्यातून अधोरेखित होते.

ताणतणावाचा अनुभव कसा घेतला जातो, याचेही प्रतिबंब या प्रवाहातून पडते. ताण आता 'तात्पुरता' राहिलेला नाही - तो वाढत्या प्रमाणात दीर्घकालीन आहे, शैक्षणिक दबाव, कामगिरीच्या अपेक्षा, नोकरीची असुरक्षितता, नातेसंबंधातील ताण, मर्यादित वैयक्तिक विश्रांती आणि शहरी जीवनशैलीच्या दबावांमुळे त्याला आकार येतो.

या माहितीमध्ये भावनिक त्रास आणि सामना करण्याच्या वर्तनांमधील ओव्हरलॅपसुद्धा दिसून येतो. यामध्ये अंमली पदार्थांचा वापर आणि वर्तनात्मक व्यसन-संबंधित चिंता (५.३९ टक्के ) आणि चिंता/घबराट / फोबिया लक्षणे (५.०८ टक्के ) यांचा समावेश आहे. दुसरीकडे १.५५ टक्के आत्महत्येचे विचार किंवा प्रयत्न नोंदवण्यात आले, त्यातून सुलभ, कलंकमुक्त मानसिक आरोग्याच्या आधाराची निकड जोरदारपणे ठसते. सुलभ सहभागाच्या पर्यायांचा विस्तार करण्याचा एक भाग म्हणून - विशेषतः पारंपारिक मौखिक समुपदेशनाचे ज्यांना भय वाटू शकते अशा व्यक्तींसाठी, एम्पॉवरने पुण्यात एम्पॉवरच्या दशक वर्षपूर्तीनिमित्त मोफत डान्स/आर्ट थेरपी चळवळ कार्यशाळेचे आयोजन केले.

स्पर्धात्मक शैक्षणिक आणि व्यावसायिक वातावरण, लांबचा प्रवास, वाहतूक कोंडी आणि मर्यादित वैयक्तिक डाउनटाइम आणि कामगिरीच्या उंचावलेल्या अपेक्षा यांसारख्या शहरी जीवनशैलीतील दबावांमुळे पुण्यातील तरुणांना वाढीव प्रमाणातील ताण आणि भावनिक त्रास सहन करावा लागत आहे.